नागपूर महानगरपालिकेची **विशेष** सभा **बुधवार दिनांक ३०/०६/२०२१ रोजी सकाळी ११.००** वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातुन मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि(१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजित केलेल्या सभेचे कार्यवृत्त.**

**उपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| ४. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| ५. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ६. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| ७. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| ८. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ९. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| १०. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| ११. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| १२. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| १३. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| १४. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| १५. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| १६. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| १७. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| १८. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| १९. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| २०. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| २१. | ८ | ब | अंसारी सय्यदा | |
| २२. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| २३. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| २४. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| २५. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| २६. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| २७. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| २८. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| २९. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| ३१. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| ३२. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| ३३. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| ३४. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| ३५. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| ३६. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| ३७. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| ३८. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ३९. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| ४०. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ४१. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ४२. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ४३. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ४४. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| ४५. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ४६. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ४७. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ४८. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ४९. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ५०. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ५१. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ५२. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ५३. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ५४. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ५५. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ५६. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ५७. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| ५८. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ५९. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ६०. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| ६१. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ६२. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ६३. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ६४. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ६५. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ६६. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ६७. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ६८. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६९. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ७०. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ७१. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ७२. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| ७३. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| ७४. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| ७५. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| ७६. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ७७. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| ७८. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| ७९. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ८०. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| ८१. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ८२. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| ८३. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| ८४. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ८५. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| ८६. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| ८७. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| ८८. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| ८९. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| ९०. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

## **अनुपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| २. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ३. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ४. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| ५. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| ६. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| ७. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| ८. | ५ | अ | रिक्त | |
| ९. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| १०. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| ११. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| १२. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १३. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| १४. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| १५. | ९ | ब | संजय श्यामराव बुरेवार | सदस्य |
| १६. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| १७. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् |
| १८. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| १९. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| २०. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| २१. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| २२. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| २३. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| २४. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| २५. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| २६. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| २७. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| २८. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| २९. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| ३०. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| ३१. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ३२. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| ३३. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ३४. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ३५. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| ३६. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ३७. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| ३८. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ३९. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| ४०. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| ४१. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ४२. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ४३. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ४४. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| ४५. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ४६. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ४७. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ४८. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ४९. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ५०. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| ५१. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ५२. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ५३. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ५४. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ५५. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ५६. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ५७. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ५८. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ५९. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| ६०. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ६१. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| ६२. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ६३. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| ६४. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| ६५. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ६६. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |

**उपस्थित अधिकारी**

**श्री.राधाकृष्णन बी.  निगम आयुक्त**

**डॉ.रंजना लाडे  निगम सचिव**

**मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.**

महापौर:-महानगरपालिकेची स्थगित सभा आपण पुन्हा सुरु करीत आहे. हा विषय स्थगण प्रस्तावाच्या माध्यमातून सभागृहापुढे आला होता आणि स्थगण प्रस्ताव नगरसेविका आभाताई पांडे यांनी मांडला होता त्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, मैंने जो स्थगन प्रस्ताव लगाया था, उस विषय की गंभीरता को देखते हुऐ आपने उसके लिये एक विशेष सभा ली है, इस बात के लिये मैं आपके प्रति आभार व्यक्त करती हुॅं और धन्यवाद व्यक्त करती हुॅं । मा.महापौरजी, जनता की जान बचाने के लिये आपत्ती व्यवस्थापन के लिये, कोरोना के लिये केंद्र शासन और राज्य सरकार का जो निधी था, उसके उपयोग मे कही न कही अनियमितता और गैरव्यवहार हुऐ है, यह बात मैं केवल विरोधी पक्ष की नगरसेविका हुॅं इसलिये नही कह रही हुॅं, मैंने तथ्यो के साथ सभी बातो का खुलासा किया है, और उसके बाद मैं यह बात

कह रही हुॅ, मा.महापौरजी, यह बात आपको विदित है कि मैंने कम से कम आठ नव माह पूर्व प्रशासन को पत्र देकर जानकारी मांगी, मुझे जानकारी देने मे घुमाया गया, जब मुझे घुमाया गया तो मुझे जिज्ञासा पैदा हुई कि, मैंने फाईल पढनी चाहिये, और फाईल दिखाने के लिये भी बहुत बार डामाडोल किया गया है, तब जाकर मैं आपके पास आयी । मा.महापौरजी, आपने मेरी विनंती को मान्य करके मुझे सारी नस्तीयॉ उपलब्ध करवाई, मा.महापौरजी, मैंने कुछ दिनो पूर्व एक विनंतीपत्र मा.आयुक्त महोदय को दिया था और आयुक्त महोदय से निवेदन किया था उस पत्र के माध्यम से कि, मैंने जो फाईंडींग फाईल पढकर निकाली है, उसमे मुझे ऐसा लगता है कि, कही न कही भ्रष्टाचार की बु आरही है, कही न कही इसमे आर्थिक गैरव्यवहार हुआ है, इसलिये तुरंत इस बात की चौकशी की जाये । और चौकशी करते वक्त उस विभाग के जो कर्मचारी अधिकारी है, उन्हे पदमुक्त किया जाये, महापौरजी, यह सारी चिजे होने के बाद मैंने प्रेस ली, महापौरजी, मैंने उस दिन भी कहां था कि, आयुक्त महोदय इस सारी चिजो मे गंभीर नही है, मा.महापौरजी, मैंने उन्हे पत्र दिया था फाईल दिखाने के लिये लैकिन आयुक्त महोदय ने मुझे मेरे फाईंडिंग के जवाब दिये, मा.महापौरजी, मैं आयुक्त महोदय से पुछना चाहती हुॅ कि, जो फाईडींग के जवाब प्रशासन ने दिये है क्या आयुक्त महोदय उससे संतुष्ट है ?

महापौर:- मा.आभा पांडे ही सभा आपण स्थगण प्रस्ताव वर चर्चा करण्याकरिता ठेवली आहे. स्थगण प्रस्तावावर जे नियम आहेत त्या नियमाप्रमाणे स्थगण प्रस्तावावर आपल्याला जे आरोप करावयाचे आहेत ते सर्व एकत्र करावे त्यानंतर आयुक्त आपले निवेदन आपल्या समोर मांडतील.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, ही विशेष सभा आहे म्हणून मी प्रश्न विचारला आहे. आपल्या आदेशाचे पालन मी करते आहे मा.महापौरजी,

महापौर:- सखोल चर्चा झाली पाहिजे म्हणून आपण फुल डे सभा घेतली आहे.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, मला हे मान्य आहे, परंतु ही विशेष सभा आहे म्हणुन मी प्रश्न विचारला आहे. मी आपल्या आदेशाचे पालन करीन, हे मला मान्य आहे. सर्वांत शेवटी माझ्या प्रश्नाची उत्तरे आयुक्तांनी दिली पाहिजे. मा.महापौरजी, नस्त्या वाचत असतांना माझ्या निदर्शनास असे आले कि, मा.अति.आयुक्त, श्री राम जोशी साहेब यांच्याकडे तो विभाग नव्हता हे मी कशावरुन म्हणत आहे, सामान्य प्रशासन विभागाचे जे आदेश होते मा.महापौरजी ते आदेश मी काढले होते. ३१.०७.२०२० ला तत्कालीन आयुक्त श्री तुकारामजी मुंढेजी ने एक आदेश काढला होता आणि कोणता विभाग कोणत्या विभाग प्रमुखांकडे राहिल, त्याच्यामध्ये आदेश दिलेले होते. मा.महापौरजी, तुकारामजी मुढे यांनी आरोग्य विभाग स्वत:कडे ठेवले होते, आणि त्याच्यानंतर तत्कालीन आयुक्त श्री तुकारामजी मुंढे साहेबांची बदली झाली आणि त्यानंतर नवीन आयुक्त श्री राधाकृष्ण बी आले नागपूर महानगरपालिकेत आणि त्यांनी ही कोणाला ही या विभगाकरिता नेमले नाही, यात कोणतेही बदल केले नाही, ही माहिती मला सामान्य प्रशासन विभागाकडुन मिळाली, आहे. मा.महापौरजी, मग आनन-फानन मा.आयुक्त, श्री राधाकृष्ण साहेबांनी ९.०६ ला आदेश काढला आणि त्या आदेशामध्ये हे नमुद केला कि, आता जे आरोग्य विभाग आहे, ते आदरणीय राम जोशी साहेबांकडे राहिल. मा.महापौरजी, म्हणजे ९.६. पूर्वी हा विभाग श्री राम

जोशी साहेबांकडे नव्हता, असा त्याचा प्रशासकीय अर्थ होतो, तरी सुध्दा मा.महापौरजी, अतिरिक्त आयुक्त श्री राम जोशी साहेबांशी अनेक खेरेदी केलेल्या वस्तुच्या फाईलवर सिग्नेचर केलेल्या आहेत, मा.महापौरजी, हा अधिकार यांना कोणी दिला होता, मा.महापौरजी, अधिकार नस्तांना करोडो रुपयांच्या कोटयावधी रुपयांच्या खरेदीच्या प्रस्तावाला मान्यता देवुन त्यांनी देयका मंजूरी प्रदान केलेली आहे, त्या नस्तीवर सही केलेली आहे, म्हणुनच मी म्हणत आहे कि हे भ्रष्टाचार आहे. चार्ज नस्तांना केलेले काम आहे. ही सर्व अव्यवहारिक घटना कोविडचा जो निधी आला होता, त्यावेळी झालेली आहे. मा.महापौरजी, मी यामध्ये जे फाईंडींग काढले होते त्यामध्ये शासनाच्या अरोग्य विभागाकडुन आपल्याला प्राप्त झालेले होते आदरणीय सवई साहेब, आरोग्य विभागात ते २४.१०.२० पर्यंत सुटटीवर होते, सुटटीवर असतांना या कालावधीच्या दरम्यान त्यांच्या अनेक सहया फाईलमध्ये आढळुन आलेल्या आहेत. माझ्याकडे हे सगळे प्रुफ आहे, मा.महापौरजी, एखादा अधिकारी जेव्हा सुटटीवर जाते तेव्हा दुस-या व्यक्तीला त्याचा चार्ज दिल्या जातो आणि तो चार्ज दिला होता, एकदा बहिरवार साहेबांना दिला होता आणि ज्यावेळी त्यांना कोरोना झाला तो चार्ज बहिरवारचा चिखले साहेबांना दिला, जो अधिकारी सुटटीवर जातो तो त्या काळामध्ये कोणत्याही नस्तीवर सही करीत नाही, त्या दिवशी सवई साहेबांचा चार्ज दुस-या अधिका-यांकडे होता तर सवई साहेबांनी सुटटीवर असतांना सही कशी केली. मा.महापौरजी, हा खूप मोठा घोळ आहे, अनेक प्रकरणामध्ये हया अधिका-यांनी स्वाक्षरी केल्या आहेत, हे माझ्याकडे प्रुफ आहे. मा.महापौरजी, नियमाप्रमाणे अश्याप्रकारे अधिका-यांनी स्वाक्षरी करणे कितपत योग्य आहे. हे अधिकार त्यांना कोणी दिले होते कि, आयुक्तांनी दिले होते कि महापौरजी यांनी दिले होते. हया सगळया घटनेमुळे आपल्यासमोर प्रश्नचिन्ह लागत आहे. पाझीटीव्ह व्यक्तीकडे नस्ती कोण घेवुन गेले असेल आपण सगळयांना निर्देश देतो कि, नागपूर शहरात जर एक ही व्यक्ति पाझीटीव्ह आला असेल तर त्याच्या घरच्या लोकांनी त्यांच्या संपर्कात येवु नये, आपण निर्देश दिले नागपूर शहरवासियाना परंतु एखादया अधिका-यांला कोरोना झाला असेल तर तो अश्याप्रकारे सही करु शकते काय ? त्यांचा संपर्कात दुसरा कोणी व्यक्ति आला तर त्याला ही कोरोना होवु शकतो, याची दखल कोणी का घेतली नाही, म्हणुन मा.महापौरजी या विषयावर आपली दखल हवी आहे. आणि सभागृहाची दखल हवी आहे, म्हणुन मी आपणांस निवेदन करीत आहे. मा.महापौरजी, अश्याप्रकारे केंद्र व राज्य सरकारकडुन मिळालेल्या अनुदानातुन यांनी कोण-कोणत्या साहित्याची खरेदी केल्या आहेत जेव्हा आपण त्या नस्तीचे अवलोकन केले तर त्यावर अनेक अधिका-यांच्या स्वाक्षरी आहे, राम जोशी साहेबांच्या सुध्दा स्वाक्षरी आहे, अश्याप्रकारे एखादे अधिकारी असा घोळ करीत असेल तर ते कितपत योग्य आहे. हा माझा प्रश्न आहे, या फाईलमध्ये एक आश्चर्यजनक बाब माझ्या लक्षात आली आहे, २२.१०.२००८ मध्ये जेव्हा पाटणेजी अतिरिक्त आयुक्त होते तेव्हा त्यांनी एक आदेश काढला होता जेव्हा काही साहित्यांची खरेदी करावयाची असेल तर पाटणे साहेबांचाआदेश त्या नस्तीमध्ये लावण्यांत येतो, मा.महापौरजी, २००८ गेले आता २०२१ आले आहे, तरी सुध्दा २००८ चे आदेश नस्तीमध्ये लावल्यामुळे आपल्या मनात संभ्रम निर्माण होत आहे. अनेक खरेदीमध्ये घोटाळे झाले आहे म्हणुन या विषयामध्ये एक चांगला निर्णय आपण सर्वांनी मिळवुन घेणे गरजेचे आहे. प्रशासनानी

सांगीतले कि आम्ही साहित्याची खरेदी रेट काँट्रक्टनुसार करतो, एखाद्या वेळेस मुंबई महानगरपालिका असतील, पिंपरी चिंचवड महानगरपालिका असतील तर आपण त्यांचे अनुकरण करतो, परंतु साहित्यांची खरेदी करीत असतांना आपण भंडारा, अमरावती या महानगरपालिकेचे अनुकरण करतो. प्रशासनानी सांगीतले कि, आम्ही भंडाराच्या रेट काँट्रक्टनुसार खरेदी केली, मा.महापौरजी, माझे हे म्हणणे आहे कि आपली मोठी स्वायत्ता संस्था आहे, आपण भंडाराच्या रेट कॉट्रक्टप्रमाणे खरेदी कराल काय ? एखाद्या वेळेस आपण मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवडचे अनुकरण करणे ठिक आहे, एखादया साहित्याची खरेदी करण्यामध्ये आपण त्यांचे रेट काँट्रक्ट घेवु परंतु भंडारा, जालना व अमरावतीचे रेट काँट्रक्ट घेणे हे काय आहे. यामध्ये जे काही घोळ झालेले आहे ते मी तुमच्या निदर्शनास आणुन देत आहे. मा.महापौरजी, आपण कोणते साहित्य खरेदी करीत आहे, त्याचे नांव त्या साहित्याचे रेट नस्तीमध्ये लिहिणे आवश्यक आहे, परंतु खरेदी करीत असतांना रेट काँट्रक्टच्या बाबतीत मोठया संस्थेनी लहान संस्थेचे अनुकरण करणे योग्य नाही. येथे कायद्याचे उल्लंघन झालेले आहे. या अनुषंगाने अनेक प्रस्ताव मी वाचलेले आहे, प्रस्ताव विना तारखेचे आहे, कार्यादेश विना तारखेचे आहे, अनेक संस्थेनी पत्र देतांना त्यावर तारीख टाकली नाही, ही बाब अधिका-यांनी पाहिली, नाही, कर्मचा-यांनी पाहिली नाही, त्या प्रस्तावावर अनेक अधिका"यांनी स्वाक्षरी केली, अनेक कर्मचा-**यांनी स्वाक्षरी केली**,**याच्या** मागचा उद्येश काय होता, त्या संस्थेला फायदा पहोचविण्याचा उद्येश असेल म्हणुन त्यांनी पाहिले नाही, असा संशय निर्माण होत आहे, त्याचे प्रुफ माझ्याकडे आहे. यादृष्टीने सुध्दा या विषयाकडे पाहणे गरजेचे आहे म्हणुनच मी मी म्हटले आहे कि या विषयात पुर्ण भोंगळ कारोबार झालेला आहे. मा.महापौरजी, प्रस्ताव विना तारखेचे आहे, कार्यादेश विना तारखेचे आहे, आणि वारंवार या बाबतीतले अनेक घोटाळे नजरेस येत आहे, मा.महापौरजी, एकाच बिलाचे भुगतान दोनही अनुदानातुन करण्यांत आले आहे, असे माझ्या निदर्शनास आले आहे. मी विभागाकडे जी माहिती मागितली होती त्याप्रमाणे मला अपुरी माहिती देण्यांत आली, २००० मध्ये पी.टी.एम. किट घेतल्या, एफ.डी.ए.कडुन त्याला प्रशासकीय मंजूरी दिली नाही, सदर किट एकच दिवशी एफ.डी.ए.कडुन घेतल्याचे माझ्या निदर्शनास आलेले आहे. मी विभागाकडे वारंवार विचारणा केली तेव्हा ९.२८ लक्ष रुपयांत घेण्यांत आले होते परंतु मला जी माहिती देण्यांत आली ती ५.२८ लक्ष रुपयांची माहिती देण्यांत आली, आणि मला असे वाटते कि मी एक घरगुती महिला आहे, एका घरगुती महिलेला जेव्हा हे निदर्शनास येतो ज्या अधिका-यांच्या डोळयासमोर हया नस्त्या जातात, त्यांच्या का लक्षात हा प्रकार आला नाही. म्हणुन माझ्या मनात संशय निर्माण झाला आहे आणि म्हणुन मी म्हणते कि, जनतेच्या जीव वाचविण्याकरिता आलेल्या निधीमधुन उधळपटटी करुन प्रस्ताव सादर करण्यांत आले, हा माझा आरोप आहे, मा.महापौरजी, एकाच बिलाचे दोनदा भुगतान करण्यांत आले आहे, त्यामध्ये पीपीई किट ही फार मोठयाप्रमाणात महानगरपालिकेत आलेली होती. परंतु ती सुध्दा खरेदी केल्याचे निदर्शनास आले आहे. काही हरकत नाही, लागले असेल म्हणुन खरेदी केली आहे प्रशासनानी, परंतु पीपीई किट खरेदी करीत असतांना ती पुरवठादारांकडुन खरेदी करण्यांत आली, २४,०५६ पीपीई किट खरेदी करण्यांत आल्या. त्याचे भुगतान एसडीएफ निधीमधुन करण्याची मंजूरी घेतली, त्याचे भुगतान करीत असतांना

त्याच्यात सुध्दा मोठयाप्रमाणात घोळ झाल्याचे दिसुन आलेले आहे. मा.महापौरजी, संपुर्ण प्रकरणामध्ये एकाच पध्दतीचे वाटप केल्याचे दिसुन येत आहे, ही लाजिरवाणी बाब आहे आणि ती ही प्रशासनानी आपत्ती व्यवस्थापन काळामध्ये केली आहे, हे बरोबर नाही. विविध अनियमिततेचा भोंगळ कारोबार झालेला आहे मी म्हटल्याप्रमाणे एकाच पदावर असलेले दोन वेगवेगळे अधिका-यांनी वेगवेगळया प्रस्तावाला मंजूरी प्रदान केली आहे. ती कशी केली आहे, प्रतिबंधक उपाययोजना साहित्याची खरेदी बाजारातुन करण्यांत आलेली आहे. या अनुषंगाने मे. हेल्थ प्रायव्हेट लि. या पुरवठाराकडुन प्रशासकीय मान्यतेनी साहित्य खरेदी केल्याचे दिसुन येत आहे, किट खरेदी केल्यानंतर त्याचे भुगतान एम.एस.निधी मधुन संबंधित पुरवठादाराना करण्यांत आले आहे. संबंधित पुरवठादाला शासनाच्या निधी मधुन भुगतान करण्यात आल्याचे दिसुन येत आहे, म्हणुन मी म्हणत आहे कि वित्तीय अनियमितता झाल्याचे नाकारता येत नाही, एकाच पदावर असलेले दोन वेगवेगळे अधिकारी वेगवेगळया कॉट्रक्टच्या भुगतानाच्या प्रकरणाला मंजूरी देत होते, म्हणुन संशय माझ्या मनात निर्माण झालेला आहे. मा.महापौरजी, एखादी वस्तु खरेदी करावयाची राहिली तर ती कश्यापध्दतीने खरेदी करावयास पाहिजे, परंतु येथे असे निदर्शनास येते कि, ती नियमबाहय पध्दतीने खरेदी करण्यांत आलेली आहे, मा.महापौरजी, मा.सत्तापक्षनेते श्री अविनाशजी ठाकरेने एक प्रश्न केला होता आपणांस कि, जी वित्तीय खरेदी झालेली आहे, तो शासनाचा निधी आहे, त्याचा तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवणे आवश्यक आहे. मा.महापौरजी, या अनुसार आपण प्रशासनाला निर्देश दिले त्यांनी आपला अहवाल सादर केला, या अहवालामध्ये मी जेव्हा प्रेस घेतली, प्रेस घेतल्यानंतर मी आपणांस व मा.आयुक्तांना दोघांना पत्र दिले होते कि मला जी प्रोव्हीजन नोंदवही आहे त्याची प्रत देण्यांत यावी, आणि कार्यादेशाची प्रत सुध्दा मला देण्यांत यावी. मा.महापौरजी, प्रशासनाला पत्र दिल्यानंतर मी पुन्हा आपणांकडे आली, व आपण पुन्हा प्रशासनाला स्मरणपत्र दिले कि, जनप्रतिनिधीला माहिती द्यावयास पाहिजे तो त्यांचा मुळे अधिकार आहे, मा.महापौरजी, त्याच्यानंतर मला ते दाखविण्यांत आले, मा.महापौरजी, त्याच्यात एक आश्चर्यजनक प्रकार माझ्या डोळयासमोर आला, प्रोव्हीजन यादी व कार्यादेशाची यादी वाचत असतांना माझ्या लक्षात असे आले कि एकाच फार्मासिटीकल कंपनीकडुन ऐअर कंडीशन घेण्यांत आले, फॉर्मासिटीकल कंपनी एअर कंडीशन विकते नंतर मी माहिती काढली कि, मला आश्चर्य वाटले, नंतर मी माहिती काढली ही मल्टीनॅशनल कंपनी आहे काय ? एखादया कपडयांच्या दुकानात आपल्याला साबुण भेटेल काय ? मी दोन्ही नोंद वही काढली, मी दोन्ही नोंद वही काढल्यानंतर मी लेखा व वित्त अधिकारी जे आमचे आहे त्यांच्याकडुन यादी मागीतली, मा.महापौरजी, मी त्यांचे अभिनंदन करेल, ज्या दिवशी मी त्यांना यादी मागितली दुस-या दिवशी ती यादी माझ्या घरी आली, ज्या अधिका-यांनी प्रामाणिक काम केले आहे त्यांचे कौतुक जनप्रतिनिधीनी केले पाहिजे. मा.महापौरजी, ती यादी बघत असतांना त्याच्यामध्ये एअर कंडीशन खरेदी करीत असतांना त्या फॉर्मासिटीकल कंपनीचा बिल दुस-या यादीमध्ये दाखविला आहे, मा.महापौरजी, प्रोव्हीजन यादी आपण तयार करतो प्रोव्हीजन यादीनुसारच वर्क आर्डरचा रजिस्टर मेनटेन होते, आणि त्यानुसार वर्क आर्डरच्या रजिस्टरमध्ये इंट्री होते आणि वर्क आर्डरच्या रजिस्टरनुसारच बिल बनते आणि बिल बनल्यानंतर त्यांना बील देण्यांत येते.

मा.महापौरजी, या सगळया बाबीमध्ये मोठा घोळ निदर्शनास आलेला आहे. याला नाकारता येत नाही, मा.महापौरजी, एक बाब मी आपल्या निदर्शनास आणुन दिली दुसरी बाब अशी आहे कि, मुद्या तीन मध्ये नागपूर शहरामध्ये तसेच संपुर्ण देशात संचार बंदी लागु झाल्यामुळे बाजार पेठेत आवश्यक साहित्य,औषद्ये व इतर आयटम उपलबध नसलयामुळे तसेच बाजारपेठ बंद असल्याने अतिआवश्यक औषद्यी व साहित्य मिळणे शक्य नव्हते, मा.महापोरजी, राज्य सरकारच्या निदर्शनासुर नागपूर महानगरपालिकेनी अश्या अनेक अधिसूचना जारी केल्या आहेत त्यामध्ये आम्ही नेहमी व वारंवार सांगीतले आहे कि, लॉकडाउन होवुन सुध्दा अति आवश्यक वस्तु ही मिळणार, अति आवश्यक वस्तुंची दुकाने हे कधीही बंद नव्हती, म्हणुनच मी म्हणत आहे कि, हा जो अहवाल सदनाच्या पटलावर ठेवलेला आहे तो सदनाची दिशाभुल करणारा अहवाल आहे. फक्त याच्यात प्रशासनानी हेच दाखविले कि, आम्ही असे का केले आहे, आम्ही जनतेला आरोग्य सेवा पुरविण्याकरिता योग्य ती खरेदी केली आहे. मा.महापौरजी, हे कितपत योग्य आहे. मा.महापौरजी, याच्यामध्ये सांगीतला आहे कि मंजूर देय करार किंवा आवेदन बोलावुन हॉफकिंग, जी.एम.सी. आयजी.एम.सी. हे सगळा नमुद आहे. ९९ प्रतिशत ज्या नस्त्या आहे हया विभागाच्या त्या नस्त्यामध्ये कुठेही हॉफकिंगचा उल्लेख केलेला नाही किंवा त्याचा आधार घेतलेला नाही, मा.महापौरजी, शासनाचे निर्देश आहे कि हॉफकिंग ही सरकारी संस्था आहे, कोणतेही साहित्य घेत असतांना ते सरकारी संस्था म्हणजे हॉफकिंग कडुन घ्यावे आणि जर एखादी वस्तु हॉफकिंगकडे उपलब्ध नसेल तर हॉफकिंगचे जे रेट कॉट्रक्ट आहे त्या दरामध्ये दुस-याकडुन घेवु शकतात. परंतु मा.महापौरजी, तसा करण्यांत आलेला नाही, मा.महापोरजी, रेट कॉट्रक्ट कोणाचे घेतले, अमरावतीचे घेतले, भंडाराचा घेतले जालनाचे घेतले मी ही बाब आधीच सांगीतली आहे, याच्यामध्ये अनियमितता झालेली आहे, आणि चुका झालेल्या आहेत. मा.महापौरजी, याच्यामध्ये मी उदाहरण देवु इच्छितो कि एकच पुरवठादाराकडुन सीएनजी टेस्ट ऑपरेशनचे साहित्य खरेदी करण्यांत आले आहे, एकाच वेळेस या पुरवठादारांनी थर्मामिटर प्रति नग कमी किमतीमध्ये आपल्याला दिलेदुस-यांदा हिच फर्म हे थर्मामिटर आपल्याला साडे चार हजार रुपये प्रतिनगमध्ये देते, मा.महापौरजी, एखादयावेळेस पैश्याची उलाढाल होवु शकते, मा.महापौरजी, थर्मामिटर खेरेदी करीत असतांना ५-५ हजार रुपये महाग प्रति नगानी नागपूर महानगरपालिकेनी खरेदी केल्या आहेत, येथे जनतेच्या पैश्याची लुट झालेली आहे. आणि सीएनजी फोर्स ११ हजार रुपये मध्ये देते, आणि दुसरीची फर्म आहे ती पहिल्यांदा कमी किंमतीमध्ये साहित्य देतो व दुस-यांदा जास्त किंमतीमध्ये साहित्य देते, म्हणजे आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे दिसुन येत आहे. त्याचबरोबर ऑक्सिमिटर २४०० रुपयेमध्ये खरेदी करण्यांत आले आहे. पहिले हेच ऑक्सिमिटर आपल्याला कमी किंमतीमध्ये मिळाले आहे, प्रशासनानी अहवाल सादर करीत असतांना हॉफकिंगचा उल्लेख केला आहे, जर हॉफकिंगच्या दरानुसार खरेदी केली असती तर एकाच दरामध्ये महानगरपालिकेनी सगळया वस्तु खरेदी केल्या असत्या परंतु एक ही वस्तु एकही दरामध्ये खरेदी केलेली नाही, ती अनेक अनेक दरामध्ये खरेदी केलेली आहे, असे निदर्शनास येत आहे, प्रशासनानी त्याचे रेट कॉट्रक्ट बनविले नाही. ही मोठी चुक आहे, जी प्रशासनानी केली आहे. वित्त व लेखा विभागाकडुन आलेल्या यादीमधये असे निदर्शनास आलेल आहे कि,

थर्मामिटरचा बिल पी.एच.डी. सेल्स कंपनीला त्याच दिवशी म्हणजे २१.०९.२०२० ला देण्यांत आला. तो ही लाखो रुपयांचे दोन बिल त्यांना देण्यांत आले. मा.महापौरजी, हे कितपत योग्य आहे, कि दोन बिल ९ लाख रुपयांचे एकाच दिवशी त्या कंपनीला देण्यांत आले आहे. यात मोठा घोळ दिसुन येत आहे, हे नियमाचे उल्लंघन आहे. मा.महापौरजी, पीपीई किटमध्ये सुध्दा तसेच झालेले आहे जो पीपीई किट आपण ८४० रुपयामध्ये घेतली दुस-यांदा तिच पीपीई किट आपण ४०० रुपये मध्ये घेतली, तिसरी किट आपण ८२० रुपयेमध्ये घेतली, चौथी किट आपण २३८ रुपये मध्ये घेतली, पुन्हा आपण ६०० रुपयेमध्ये पीपीई किट घेतली. पुन्हा आपण ३२५ रुपयामध्ये घेतली, मा.महापौरजी, मुंबई महानगरपालिकेनी एक पत्रक काढले आहे, माझ्या मोबाईलमध्ये ते आहे त्यांनी पीपीई किट खरेदी करीत असतांना १७० रुपये मध्ये पीपीई किट खरेदी केलेली आहे, मा.महापौरजी, आरोप करतांना पत्रकार परिषदेमध्ये मी हे म्हटले होते कि यापूर्वी माजी महापौरजी श्री संदिपजी जोशीने आरोप लावले होते, ५०० रुपयाच्या वर पीपीई किटचे रेट जनसामन्य नागरिकांना लावु शकत नाही.परंतु महानगरपालिका पीपीई किट खरेदी करीत असतांना ८३० रुपयेमध्ये खरेदी करते, त्यावेळच्याआयुक्तांनी याकडे लक्ष दिले असते तर ही परिस्थिती निर्माण झाली नस्ती. मा.महापौरजी, आपण खरेदी केलेल्या वस्तु, खरेदी केल्यानंतर ते कुठे कुठे दिल्या, कोणत्या दवाखान्यात दिल्या, कोणत्या व्यक्तिला दिल्या याकरिता आलेल्या वस्तुची स्टॉक बुकमध्ये नोंद करतो, हया सर्व बाबी स्टॉक बुक मध्ये लिहिलेल्या नाही, स्टॉक बुकमध्ये घेणा-या व्यक्तिचे तर नांव आहे, परंतु जो घेणारा व्यक्ति आहे त्यांचे नांव नाही, सिव्हीलमधुन हया वस्तु कोणत्या विभागाला दिल्या, कोणत्या अधिकारी व कर्मचा-याला दिल्या त्याची स्वाक्षरी नाही, स्टॉक बुकमध्ये हया सर्व वस्तुंची नोंद केल्याचे माझ्या निदर्शनास आले नाही, स्टॉक बुकमध्ये आपण कशाकरिता नोंद करतो याकरिता करतो कि आलेल्या वस्तु व दिलेल्या वस्तुचे तंतोतंत नोंद झाल्या पाहिजे, परंतु तसे न झाल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे. म्हणुन मी म्हणत आहे कि हयामध्ये मोठयाप्रमाणात अनियमितता झालेल्या आहेत. मा.महापौरजी, पांचवा मुद्या यांनी दिलेला आहे कि कोविड केअर सेंटरकरिता दर मंजूर करुन व्यवस्था करण्यांत आली त्यामध्ये चहा,नाशता, जेवण सगळयांची व्यवस्था कोरांटाईन सेंटरकरिता उपलब्ध करुन देण्यांत आली, मा.महापौरजी, माझे हे म्हणणे आहे कि नागपूर महानगरपालिकेनी २२ लाख गरीब जनतेला निशुल्क जेवण पुरविले आम्ही याकरिता महानगरपालिकेचे अभिनंदन करतो. नागपूर महानगरपालिकेकरिता ज्यांनी ही योजना राबविली, याच्यामध्ये जे गरीब २२ लाख लोकांना जेवण पुरविण्यांत आले आहे याच्यामध्ये अनेक व्यापारी व सामाजिक संस्थानी मदत केली आहे जे लोक या कामात मदत करु शकले नाही त्या लोकांनी श्रमदान सुध्दा केले. परंतु दिलेल्या माहितीनुसार नागरिकांच्या भोजनाकरिता व्यवस्था विभागाकडुन करण्यांत आली होती, याकरिता दहिकर नावाची एक संस्था होती त्यांना चार वेळेस पेमेंट झालेले आहे, त्यांना १ कोटी ४४ लक्ष ७० हजार २५४ रुपये कोरंटाईन सेंटरवर नागरिकांना जेवण देण्यासाठी पेमेंट करण्यांत आले आहे, ते कोराईन सेंटरवर नागरिकांना खाण्यासाठी का देत होते कि आपण येवढे बिल त्यांना दिले आहे. या व्यतिरिक्त कोरंटाईन सेंटरवर आपण गरीब लोकांना सामाजिक संस्थेच्या माध्यमातुन जेवण दिले तरी या बरोबरच अनेक संस्थाना जेवणाच्या व्यवस्थेकरता ३

कोटी ६१ लक्ष ५६१ रुपये बील देण्यांत आलेले आहे, मा.महापौरजी, येवढे पैसे जेवणाच्या बिलाकरिता कसे देण्यांत आले, मा.महापौरजी हया संस्था पनीरची भाजी देत होती काय ? कि आणखी काय देत होती, राधास्वामी सत्संग मंडळ हे जेवण तयार करायचे आणि तेथुन जेवण आण्ण्याकरिता नागपूर महानगरपालिकेनी येवढे पैसे खर्च करणे हे कुठे तरी खुप आश्चर्यजनक बाब वाटत आहे, हे संश्य निर्माण करीत आहे, म्हणुन माझे म्हणणे आहे कि याच्यामध्ये खुप मोठी अनियमितता झालेली आहे. मा.महापौरजी, महानगरपालिकेमध्ये जेव्हा पासून कोविड निधी सुरु झाला तेव्हापासून आजपर्यंत अनियमितता गैरव्यवहार मोठयाप्रमाणात झालेले आहे. हा प्रकार तेव्हा ही सुरु होता आणि आज ही सुरुच आहे. मा.महापौरजी, मुद्या क्रमांक १० मध्ये सांगीतले आहे कि, कोविड रुगणांच्या घरुन तसेच इतर रुगणालय व कोविड सेंटर याठिकाणावरुन निघणारा कचरा नेण्याकरिता ए.जी. व बी.व्ही.जी. या दोन्ही कंपनीना आदेश निर्देश देण्यांत आले होते. मा.महापौरजी, मला कोरोना झाला होता जेव्हा मी वाट बघत होती कि गाडी केव्हा येईल, मी केव्हा जाईल, केव्हा कचरा टाकेल, तेव्हा गाडीवाला गाडी घेवुन येत होता. तेव्हा मी त्याला म्हणायची कि, मी कोविड रुग्ण आहे, माझ्याकडे कोविडचा पत्र होता, मी गाडीमध्ये जावुन कचरा कसा टाकणार त्यांनी मला उत्तर दिले कि, सगळयांना येवुनच कचरा टाकावा लागतो, मी पुर्ण १४ दिवस गाडीमध्ये जावुन स्वत: कचरा टाकत होती. जेणेकरुन कर्मचा-याला कोरोना नाही झाला पाहिजे तसे निर्देश देण्यांत आले होते. परंतु त्या निर्देशाचे पालन प्रशासनामध्ये बसलेल्या कर्मचा-यांनी केलेले नाही. असे निदर्शनास आलेले आहे. मा.महापौरजी, याच्यामध्ये म्हटले आहे कि हॉफकिंग व इतर मंजूर दरामध्ये वस्तु खरेदी करण्यांत आलेल्या आहेत आपली दिशाभुल करण्याकरिता प्रत्येक ठिकाणी हॉफकिंग लिहिला आहे, ज्यांनी हे वाचले त्यांना वाटले कि, अरे हॉफकिंगनुसार खरेदी केलेल्या आहे, ॲन्टीजेन्ट किट ५५ लक्ष ८९ हजार ५६६ रुपयामध्ये खरेदी करण्यांत आली आहे. व १.६६ लक्ष रुपये सिव्हील सर्जनला दिलेले आहे शासनाकडुन आलेल्या प्रत्येक वस्तुचे बिल सिव्हील सर्जनला दिले म्हणुन मी म्हणत आहे कि यामध्ये मोठयाप्रमाणात अनियमितता झाली आहे. मा.महापौरजी, याच्या व्यतिरिक्त स्टेशनरीवर किती खर्च महानगरपालिकेनी केला असेल १ कोटी ७३ लक्ष ४३२ रुपये स्टेशनरीवर खर्च करण्यांत आले आहे, मा.महापौरजी हे सुध्दा बघण्याची आवश्यकता आहे. मा.महापौरजी, अनेक पीपीई किट नागपूर महानगरपालिकेला दानमध्ये आल्या आहे, त्याची माझ्याकडे विस्तृत माहिती आहे त्याचबरोबर सिव्हील सर्जनकडुन पीपीई किट आल्या तरी सुध्दा ३५ लाख रुपयांच्या पीपीई किट एसडीआरएफ फंडा मधुन खरेदी करण्यांत आल्या, सॅनिटायझर १८.९६ लक्ष रुपयांचे खरेदी केले. ठिक आहे हे लागले असेल हे आम्हाला मान्य आहे. आमच्या झोनमध्ये अनेक कर्मचा-यांना मास्क नव्हते, अनेक कर्मचा-यांना मास्क मी पुरविले आहे, हया सगळया बाबी निदर्शनास आलेल्या आहे. मा.महापौरजी, राधास्वामी कोविड सेंटर सुरु करण्याकरिता लाखो रुपये खर्च करण्यांत आले आहे. अनेक वस्तु करोडो रुपयामध्ये खरेदी केलेल्या आहे, हा सर्व शासनाचा निधी होता, ही सर्व माहिती आयुक्त महोदयांना माहित झाली असेल, परंतु आयुक्त यात गंभीर नव्हते हा माझा अरोप आहे, आयुक्त जर गंभीर राहिले असते तर त्यांनी कर्मचा-यांवर रोक लावली असती, त्यांनी म्हटले पाहिजे होते कि माझ्याकडे असे

असे पत्र आले आहे, हा जनतेचा निधी आहे, ते जनप्रतिनिधी आहे, त्यांनी माहितीनुसार आरोप लावले आहे, त्यानुसार आपण चौकशी करुन घेवु परंतु तसे केले गेले नाही, हा मा.आयुक्तांची भावना दुखवण्याचा विषय नाही, परंतु आयुक्त या विषयावर गंभीर नाही, मी हे आरोप लावल्यानंतर स्टोअर रुम रात्रभर सुरु होते त्याठिकाणी अनेक कागद बदलविण्यांत आले, कागदाची हेरफेर करण्यात आली, तेथे रात्र रात्र बसुन अधिकारी कर्मचा-यांनी नस्ती बदलल्या म्हणुन मी निवेदन केले होते कि हया सर्व नस्त्या आपल्या कस्टडीमध्ये आपण घेतल्या असत्या किंवा आयुक्त महोदयांनी घेतल्या असत्या तर असे झाले नस्ते. मा.महापौरजी, मैं आपसे निवेदन करना चाहती हुॅ कि, आप नागपूर शहर की जनता को मदद करने के हर संभव प्रयास करते है, आपकी धर्मपत्नी बिमार है, यह मुझे मालुम है, मैंने आपको देढ बजे रात को फोन किया आपने वह फोन उठाया, आप देढ बजे रात को जनप्रतिनिधीयो के फोन उठाते है, उन्हे मदद करते है, यह बहुत अच्छी बात है, आज इस शहर की नजरे आपका जो आदेश आनेवाला है, आप जो इस विषय के संदर्भ मे निर्णय लेने वाले है, आप जो प्रशासन को निर्देश देनेवाले है उसपर सबकी निगाहे लगी हुई है। मा.महापौरजी, मैं आपसे निवेदन करती हुॅ कि, अतिरिक्त आयुक्त ने चार्ज न रहते हुऐ जो गलतीयॉ की है, अनेक नस्तीयो पर साईन की है, जब बहिरवार पॉझीटीव्ह थे तो उन्होने उस पिरीअड मे कैसे फाईल पर सही की, नस्ती मे २०१३ का महाराष्ट्र शासन का परिपत्रक क्यों लगाया गया, रेट कॉट्रक्ट के संदर्भ मे भंडारा, अमरावती का आधार क्यों लिया गया, वस्तु खरेदी मे, औषद्य खरेदी मे जो अनियमितता हुई है जो गैरव्यवहार हुआ है, मा.महापौरजी, बिना तारीख के प्रस्ताव बनाये गये है और बिना तारीख के कार्यादेश दिये गये है, मा.महापौरजी, एकही दिन मे एक ही वस्तु की खरेदी मे एक ही निधी से अलग अलग बिल कैसे देने मे आये, एक ही बील का भुगतान शासन की निधी से कैसे हुआ, इन सब चिजो की विभागीय चौकशी आपने लगाना चाहिये, हया संपुर्ण प्रकरणाची विभागीय चौकशी लावण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठवावा, तोपर्यंत या विषयाची चौकशी लावावी, यासोबतच शासनाच्या लेखा व वित विभागाकडुन याचे ऑडिट झाले पाहिजे, शासनाच्या ऑडिट विंगमार्फत याची चौकशी झाली पाहिजे. असे मी आपणांस निवेदन करीत आहे. सोबतच ज्या अधिकारी, कर्मचा-यांनी कोरोनाच्या लाटेत, होम वर्कस, आशा वर्कस, हयांनी दिवस रात्र काम केलेले आहे, ते एक एक कोविड रुग्णांच्या घरापर्यंत जात होते, मी त्या सगळयांचे अभिनंदन करते, मा.महापौरजी, मी आपणांस मागणी करीत आहे कि, हया संपुर्ण विषयावर विभागीय चौकशी लावण्यांत यावी, शासनाच्या ऑडिट विंग मार्फत या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करण्यांत यावी, तोपर्यंत संबंधित अधिकारी वर्गाना पदमुक्त करण्यात यावे, असे मी आपणांस निवेदन करीत आहे. माझ्या या निवेदनाला जनतेचा हित आहे, जनप्रतिनिधीचा हित आहे, जनता आम्हाला निवडुन पाठविते तेव्हा त्यांना असे वाटते कि, आमचा जनप्रतिनिधी असा असला पाहिजे, शासनाकडुन आलेल्या निधीचा गैरव्यवहार नाही झाला पाहिजे, या सगळया विषयावर आपण माझ्या विनंतीला मान द्याल, ही अपेक्षा करते आपण मला बोलण्याची संधी दिली, माझ्या स्थग्न प्रस्तावावर आपण विशेष सभा लावली, या विशेष सभेमध्ये मला भरपूर बोलण्याची संधी दिली, मला विषय मांडण्याची संधी दिली, आपण सगळा विषय समजण्याचे प्रयत्न केले, आपल्या सारखे महापौर नागपूर शहराला मिळाले, ही फार

चांगली गोष्ट आहे.

श्री.संदीप सहारे:-मा.महापौरजी, आभाताई पांडे यांनी या स्थगण प्रस्तावामध्ये अत्यंत चांगला अभ्यास करुन, पुर्ण सुची तयार करुन त्यांनी प्रत्येक विषयामध्ये जो घोळ झालेला आहे तो अत्यंत चांगल्या पध्दतीने मांडलेला आहे. त्याबद्दल मी त्यांचे पुनश्च अभिनंदन करते. मा.महापौरजी, आपण पाहतो, समाजामध्ये नगरसेवक म्हणून कार्य करीत असतांना अनेक नागरिक जर आपल्या हाताने चांगले कार्य झाले तर अभिनंदनही करीत असतात. परंतु हे अभिनंदन करीत असतांना अनेकदा त्यांच्यामध्ये, अनेक लोकांमध्ये एक दुर्भावना सुध्दा असते. महानगरपालिकेमध्ये सगळयात जास्त जर गडबड करणारे असतील तर ते जनप्रतिनिधी असतील परंतु प्रशासनाच्या माध्यमातून ज्या प्रकारे खरेदीविक्री करण्यात आली आहे तो अहवाल या ठिकाणी सादर करण्यात आला आहे. त्या अहवालाच्या नुसार प्रत्येक ठिकाणी फार मोठी गडबड झालेली आहे हे निदर्शनास आणून दिले आणि जो प्रस्ताव आभाताई पांडे यांनी सभागृहासमोर मांडला. कारण त्या प्रस्तावावर पुन्हा पुन्हा सांगण्याची आवश्यकता नाही. आभाताई पांडे यांनी चांगल्या प्रकारे मांडला आहे. मी त्यांच्या प्रस्तावाचे अनुमोदन करतो, समर्थन करतो. त्यांनी जर शासनाच्या माध्यमातून विभागीय चौकशी जर करावी अशी मागणी केली आहे त्याला मी समर्थन करतो. धन्यवाद

श्रीमती आयशा ऊईके:- मा.महापौरजी, आभा ताई पांडे यांनी जे निवेदन केले आहे त्याचे मी समर्थन करते.

श्री. किशोर जिचकार:- मा.महापौरजी, सन्माननीय नगरसेविका आभाताई पांडे यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर सविस्तर चर्चा घडवून आणली मी त्यांच्या प्रस्तावाचे समर्थन करतो आणि चौकशीची मागणी करतो आणि येथे थांबतो.

श्रीमती नेहा निकोसे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, मा.आभाताई पांडे यांनी जो आरोप केलेला आहे तो अत्यंत अचुक आरोप केलेला आहे. आमचा झोन क्र. १० मध्ये प्रभाग निहाय यांनी येथे दिलेले आहे की स्वच्छता अधिकारी अग्निशमक वाहकाचा वापर करुन सोडियम हायड्रोक्लोराईड या द्रावणाचा वापर करुन फवारणी सुध्दा केली आहे.परंतु आमच्या झोनमध्ये, आमच्या प्रभागामध्ये अशी कोणतीही फवारणी कोव्हीडमध्ये केलेली नाही.

श्रीमती आभा पांडे:-पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, नेहा ताई हा जो प्रस्ताव आहे हा प्रशासनाने ठेवलेला आहे आभाताईने नाही ठेवलेला आहे.

श्रीमती नेहा निकोसे:- मी म्हणत आहे की ताईने जो आरोप लावलेला आहे तो अचुक आहे. अगदी बरोबर आहे. मला असे म्हणावयाचे आहे की आमच्या झोनमध्ये कोणत्याही प्रकारची फवारणी करण्यात आलेली नाही. त्याची चौकशी करण्यात यावी. नंबर १३ मध्ये यांनी सांगितले आहे की झोन क्र. १० मध्ये सहा.आयुक्तांना कोव्हीड सेंटर उभे करण्याची आणि कोव्हीड सेंटरवर नेण्या आणण्यासाठी भाडे तत्वावर एम्बुलन्सची व्यवस्था करण्यात आली आहे आणि औषधाची व्यवस्था परंतु मी जेव्हा कोरोना पॉझीटीव्ह

होती मा.महापौरजी तेव्हा औषधाचा पुरवठा होताच नाही त्यात बी आणि  सी औषधे नव्हती मा.महापौरजी. पॅरासिटेमॉल, झिंक टॅबलेट आमच्या प्रभागात कुणालाच मिळाल्या नाहीत मा.महापोरजी, या आरोपाची सुध्दा चौकशी करण्यात यावी.  धन्यवाद मा.महापौरजी.

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी, सर्वप्रथम मी ज्या ज्या व्यक्तींनी, कर्मचा-यांनी या महामारीच्या काळामध्ये कार्य केले त्यांचे मी मनपुर्वक अभिनंदन करतो. आपले कर्मचारी असोत किंवा कोणत्याही दवाखान्याचे कर्मचारी असो, पोलीस कर्मचारी असो, त्यांचे अभिनंदन करतो, अहोरात्र ज्यांनी काम केले त्यांचे सुध्दा अभिनंदन करतो. मा.महापौरजी, जेष्ठ नगरसेविका आभाताई पांडे यांनी जे मुद्देसुद मुद्दे मांडले त्याची सखोल चर्चा होवून खरोखर जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही व्हायला पाहिजे. मा.महापौरजी, हा जो त्यांनी प्रस्ताव मांडला आहे त्याला मी समर्थन करतो. त्यांनी सर्व डिटेल्स बोललेले आहेत त्यामुळे त्यावर चर्चा करण्याचा काही फायदा नाही मी इथेच थांबतो. परंतु एक सांगतो, जो दवाखान आहे मौरा नारी मध्ये खसरा क्रमांक १०८, १०९ मध्ये त्याचे उद्‌घाटन झाले असते तर तो दवाखाना एका वर्षात पुर्ण झाला असता तर तेथील रुग्णांना त्याचा फायदा झाला असता. माझी विनंती आहे, त्याचा पैसा मंजूर आहे, त्याची जागा मंजूर आहे. त्याचे भुमीपुजन आपण घ्यावे अशी पुनश्च विनंती करतो. धन्यवाद.

श्री.नितीन साठवणे:- मा.महापौरजी, आभाताई पांडे यांनी सदनात जो प्रस्ताव सदनामध्ये मांडला आहे आणि त्याप्रमाणे मनोज भाऊ यांनी सांगितले. त्याची सखाल चौकशी झाली पाहिजे असे मी अनुमोदन करीत आहे आणि खरोखर दोषी लोकांवर कार्यवाही झाली पाहिजे. ज्यांनी चांगले काम केले त्याची प्रशंषा आणि सराहना केलीच पाहिजे परंतु या आणीबाणीच्या संक्रमणाच्या काळामध्ये अशा प्रकारचा भ्रष्टाचार होत असेल तर मी त्यांची निंदा करतो. याची सखोल चौकशी झाली पाहिजे असे माझे म्हणणे आहे. धन्यवाद.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, मा.आयुक्त, संपुर्ण सदन, सर्व नगरसेवक, नगरसेविका, पत्रकार बंधू. निश्चितच महाराष्ट्रात नव्हे, देशात नव्हे तर संपुर्ण जगामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव सुरु झाला आणि नागपूर शहरामध्ये ११ मार्च २०२० ला पहिला रुग्ण सापडला आणि नागपूर शहरात साथीची परिस्थिती निर्माण झाली. नागपूर महानगरपालिकेने अशा साथीसाठी व्यवस्थापन निश्चितपणाने केले त्यांची मी सराहना करतो. परंतु आभाताई पांडे यांनी स्थगण प्रस्ताव या सदनापुढे मांडला आणि आपण त्याला मंजूरी प्रदान केली. त्या प्रस्तावाचे मी समर्थन करतो. ज्यावेळेला महानगरपालिकेने या प्रादुर्भावावर व्यवस्थापन करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने नियोजन प्राधिकारणाच्या माध्यमातून १५ लक्ष रुपये आणि २०२०-२१ ला  ९ लक्ष ७८ हजार रुपये प्राप्त झाले. आणि त्यानंतर २०२१-२२ ला १५ लक्ष ८८ हजार १७९ असे प्राप्त झाले होते. महानगरपालिकेला या कोरोना प्रादुर्भावाचे व्यवस्थापन करण्याकरिता प्राप्त झाले होते. या व्यवस्थापनामध्ये नियमितता आणि अनियमितता या संदर्भामध्ये जो संभ्रम आढळून आले आहे त्या अनुषंगाने आभाताई पांडे यांनी सविस्तर चर्चा घडवून आणण्याच्या दृष्टीने महापालिकेचा विस्तृत अहवाल आपल्या समोर मांडला तो मांडत असतांना अनेक बाबीं  आपल्या निदर्शनास येत आहेत. आपल्या महानगरपालिकेमध्ये बीव्हीजी आणि एजी अशा दोन कंपन्या आहेत कचरा

उचलण्याकरिता, त्यावर किती खर्च करण्यात आला आणि कोणत्या एजन्सीला हे कार्य सोपविण्यात आले. त्याकरिता १ कोटी १०लक्ष ११हजार ८०० रुपयाचे भुगतान करण्यात आले अशा या जमाखर्चाच्या निधीमध्ये देण्यात आले आहे. हे करीत असतांनाआपल्या नागपूर महानगरपालिकेमध्ये व्यवस्थापन समितीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाची परवानगी न घेता आपले स्वच्छता अधिकारी म्हणून नोडल अधिकारी म्हणून सुचित केले, त्यांचे अधिकार काय? मग आम्ही नगरसेवकांनी जनतेच्या समस्या सोडविण्याकरिता कुणाला फोन करायचे. ज्यांनी हे पद दिले आहे ते शासनाच्या निर्देशानुसार एक वर्ष किंवा सहा महिन्यामध्ये बदलतील तर आम्ही काय प्रत्येक वेळी जनतेच्या प्रश्नावर वेगवेगळया अधिका-यांना फोन करायचा काय? नागपूर महानगरपालिकेमध्ये सक्षम अधिकारी नव्हते काय? डॉ.कांबळे, डॉ.गणवीर यांनी सक्षमपणे जबाबदारी सांभाळलेली नाही काय? स्वच्छता अभियान मध्ये नागपूर शहर ३ क्रमांकावरुन १८ क्रमांकावर आले. त्यावेळी मनपाचेच अधिकारी कामावर होते. डॉ. कांबले ते या पदावर होते. प्रशासनाने माहिती दयावी निश्चितपणने महानगरपालिकेमध्ये सॅनीटायझर, पीपीटी किट, मॉस्क कोणत्या संस्थेने दिली. या नोटींगमध्ये माहिती प्रशासनाने दिलेली आहे. अनेक लोकांनी, अनेक संस्थेनी सॅनीटायझर, पीपीटी किट, मॉस्क् आणि भोजनाची व्यवस्था केली याचा उल्लेख यामध्ये केलेला नाही. या अनुषंगाने दुसरा मुद्दा असा आहे की आरएल कोणकोणत्या दवाखान्यामध्ये लावण्यात आले होते. त्यामध्ये खर्च करण्यात आला तो कोणकोणत्या दवाखान्यात करण्यात आला याचे डिटेल्स माहिती त्याच्यामध्ये देण्यात आली परंतु आरएल म्हणजे काय आहे याची सविस्तर माहिती आम्हांला प्राप्त व्हायला पाहिजे. आभाताई यांनी जो मुद्दा मांडला, राधास्वामी सत्संगमध्ये जी जेवणाची व्यवस्था केली त्या जेवणाच्या व्यवस्थेकरिता ३ कोटी ६१ लक्ष ६५ हजार ३६५ रुपये याकरिता खर्च केला आणि महानगरपालिकेच्या माध्यमातून जेवणाची व्यवस्था करण्यात आली. याच्या करिता सुध्दा अनेक संस्थाकडून जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. बेघर व्यक्तीकरिता सुध्दा १ करोड २४ हजार ८६६ रुपयांचा खर्च दाखविलेला आहे. याचे नियोजन आणि व्यवस्थापन आणि म्हणून आभाताई पांडे बोलल्या. हा खर्च अनुदानातून, अनेक एनजीओच्या माध्यमातून प्राप्त झाला आहे. महानगरपालिकेच्या खर्चाच्या या आढावामध्ये माहिती देण्यात आली की जो प्राप्त झालेला निधी आहे या माध्यमातून १२५लक्षाच्या निधीचा खर्च वेगवेगळया खर्चातून याची नोंद केलेली आहे. उत्तर नागपूरमध्ये आशीनगर झोन अंतर्गत बेघर लोकांना कुठल्या आरोग्य केंद्रात, कुठल्या हॉस्पीटल आणि कुठल्या मंगल कार्यालयात ठेवण्यात आले आहे याची सुध्दा नोंद नाही. कारण पोलीस मुख्यालयाचे क्वार्टर आणि सुतिकागृह पाचपावली या ठिकाणी व्यवस्था होती. कुठल्याही मंगलकार्यालय किंवा समाज कार्यालयात या ठिकाणी व्यवस्था करण्यात आलेली नाही. या खर्चामध्ये नोंद केलेले आहे त्यानुसार कुठले मंगलकार्यालय, हॉस्पीटल कुठे कुठे ठेवण्यात आले होते ते ठिकाणी आम्हांला माहीत नाही आहे. अधिकारी मात्र या कोव्हीड प्रादुर्भावामध्ये फोन उचलत नव्हते. हॉस्पीटलचा गैरव्यवहार, इंदोरा येथील व्हिनस हॉस्पीटल असो किंवा इतर हॉस्पीटलमध्ये या परिस्थितीमध्ये फार लुटमार होत होती परंतु कोणतेही अधिकारी फोन उचलत नव्हते आणि म्हणून निश्चितपणाने आभाताई पांडे यांनी जो स्थगण प्रस्ताव ठेवलेला आहे त्यावर सखोल

चौकशी करण्यात यावी आणि दोषी अधिका-यावर कार्यवाही करण्यात यावी. आमच्या आशीनगर मध्ये बघितले की जर कुठल्या एजन्सीला आर्डर दिला काही कॅम्प्युटर आणण्यासाठी किंवा काही साहित्यासाठी तर त्या कॉन्ट्रक्टरच्या माध्यमातून ज्या ठिकाणी बोलाविले आहे त्या स्पॉट वरती डायरेक्टयायला पाहिजे. परंतु झोनमध्ये वस्त्यामध्ये विविध रुपाने प्रशासनाच्या माध्यमातून जो खर्च केला असेल किंबहुना तो नोंदविण्याचा प्रयत्न करण्यात आला. डॉक्टर आणि सहा.आयुक्त यांचा समन्वय करुनया कोरोनाच्या प्रादुर्भावात त्या झोन अंतर्गत विविध रुपाने जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. आमच्या आशीनगर झोनमध्ये वेळेवर सहा.आयुक्त यावयाचे नाही, डेप्युटी इंजिनिअर यायचे नाही की कोणतेही अधिकारी वेळेवर यायचे नाही अशी या आशीनगर झोनमध्ये संपुर्णत: अशी असुविधा आणि अव्यवस्था या आशीनगर झोनमध्ये आहे याकडे विशेष लक्ष आपण दयावे. कारण कुठेही सहा.आयुक्त आणि कुठलाही अधिकारी एकत्र बसुन चर्चा झालेली नाही. असे आमच्या निदर्शनास आले आहे याची सुध्दा चौकशी करण्यात यावी. यावर बाकी नगरसेवकांचे सुध्दा मत घेवून घ्यावे आणि निश्चित रुपाने कार्यवाही करावी. आशीनगरचे व्यवस्थापन संचालन करण्याकरिता महानगरपालिकेने विशेष रुपाने लक्ष देवून त्या ठिकाणी व्यवस्थित अधिका-याची नियुक्ती करुन आपण कार्यान्वित करावे. अशी आजच्या सभेच्या वतीने विनंती करतो. या स्थगण प्रस्तावाचे मी समर्थन करतो. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल सभागृहाचे धन्यवाद करतो आणि इथेच थांबतो. जयभीम.

श्री.किशोर कुमेरिया:- मा.महापौरजी , या कोरोना काळामध्ये सर्व लोकांनी, आपआपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यामार्फत, सगळया अधिका-यांनी आपली जबाबदारी, कर्तव्ये पार पाडलेली आहेत. महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी, सर्व अधिकारी, कर्मचा-यांनी आपआपली कर्तव्ये समजून जबाबदारीने काम केले, ख-याअर्थाने पोलीस कर्मचारी, डॉक्टर्स, नर्सेस आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांनी कामे केली आहेत परंतु रस्त्यावर येवून जास्त प्रमाणात ज्यांनी काम केले असेल तर महानगरपालिकेच्या अधिका-यांनी आणि कर्मचा-यांनी काम केलेले आहे. आपला हेल्थ विभाग, पीडब्लूडी विभाग महानगरपालिकेचे इतर विभागानी आपले कर्तव्ये व जबाबदारी समजून उत्तम, चांगले काम या महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचा-यांनी केले आहे. आपण सर्वांनी मिळून त्यांच्याकडे असलेली कतृव्ये व जबाबदारी पार पाडली त्याबद्दल त्यांचे स्वागत केले. मा.महापौरजी, आजच्या सभेमध्ये समजा अशा काळामध्ये, अशा परिस्थितीमध्ये आभाताई पांडे यांनी याठिकाणी जो विषय मांडला त्या विषयात अशा प्रकारचे काही झाले असेल तर त्यामध्ये निश्चितपणे कोव्हीडच्या प्रार्दुभावामध्ये लोकांची अडचण होती, लोकांना न्याय मिळत नसेल, जनतेच्या पैशाचे अशा पध्दतीने काम होत नसेल तर निश्चितपणे कोणताही विषय असो, हा विषय महत्वाचा आहे मी याचे समर्थन करतो. मा.महापौरजी, यावर चौकशी होवून योग्य दिशानिर्देश होईल. सर्वांचे स्वागत करुन ज्यांच्या हातून चुका घडल्या असतील त्यांच्यावर कार्यवाही करावी अशी विनंती करतो.धन्यवाद.

श्री.दुनेश्वर पेठे:- आदरणीय महापौरजी, आभाताई पांडे यांनी जो स्थगण प्रस्ताव मांडला आहे त्याचे मी समर्थन करीत आहे आणि या स्थगण प्रस्तावाच्या माध्यमातून त्यांनी जे आरोप केले आहे ते गंभीर

स्वरुपाचे आहे त्याची चौकशी झाली पाहिजे. एवढेच माझे म्हणणे आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, मला या स्थगण प्रस्तावार बोलण्याची संधी दिली त्याबद्दल फार फार धन्यवाद. सर्वप्रथम मी अपक्षामधून निवडून आलेल्या आणि नंतर राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षामध्ये सामील झालेल्या सौ.आभा ताई पांडे यांच्या मी नेतृत्वाला दाद देतो. आणि त्यांचे अभिनंदन सुध्दा करतो की त्यांनी कोरोनाच्या या महामारीमध्ये महत्वाच्या विषयावर स्थगण प्रस्तावाद्वारे चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न केला आणि धन्यवाद याच्याकरिता देतो की त्यांनी या विषयावर सगळयांना भरपूर बोलण्याची संधी दिली. मा. आभाताई पांडे जेष्ठ नगरसेविका ज्यांचा अनुभव चांगला आहे परंतु ज्या पध्दतीने भ्रष्टाचाराच्या संदर्भात त्यांनी चर्चा केली त्यांना फार तर प्रशासकीय अनियमिततेच्या संज्ञेमध्ये काम होवू शकते. त्या म्हणाल्या की अति.आयुक्त राम जोशी साहेब यांना अधिकार नसतांना स्वाक्ष-या केल्या, डॉ. सवाई साहेबांना अधिकार नसतांना ते पॉझीटीव्ह असतांना त्यांनी  स्वाक्ष-या केल्या. यामध्ये फारतर प्रशासकीय मान्यतेने जर या सहया मा.आयुक्तांनी अप्रुव्हल केल्या, या प्रस्तावाला मान्यता जर दिली तर...

श्रीमती आभा पांडे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, धर्मपाल भाऊ माझे म्हणणे आहे. त्या वस्तुच्या खरेदीच्या नस्तीवर त्यांनी सहया केल्या आहे म्हणजे काय झाले आहे.

महापौर:- आभा ताई त्यांचे वक्तव्य पुर्ण होवू दया त्यानंतर कळेल की त्यांना काय म्हणावयाचे आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, त्या भरपूर वेळा अनियमितता आहे असे म्हटले आहे. जर समजा त्या खरेदीच्या बीलावर राम जोशी किंवा डॉ. सवाई यांनी सहया केल्या असतील परंतु शेवटी ही जबाबदारी मा.आयुक्त महोदय यांची स्व:तची आहे जर त्यांचा अधिकार आहे. जर एखाद्या अधिका-याला त्या पदासाठी डेप्युट करीत असतील  किंवा मौखिक आदेश दिले असतील आणि ते मा.आयुक्तांच्या मान्यतेने झाले असेल तर फार तर त्याला प्रशासकीय अनियमिततेच्या अशा संज्ञेने म्हणू शकतो परंतु त्यात भ्रष्टाचार झाला आहे तो संशोधनाचा विषय आहे. तो संशोधनाचा विषय यासाठी आहे मा.आभाताई बोलल्या त्या खरे बोलल्या. जर एखाद्या थर्मामीटरची किंमत ४५०० असेल आणि त्याच थर्मामीटरची किंमत दुसरीकडे ५३०, ६०० आणि १००० रुपये असेल आणि आपण त्या थर्मामीटर किंमत ४५०० रुपये लावत असेल तर तो निश्चितपणे भ्रष्टाचार आहे. मा.महापौरजी, आभाताई पांडे यांनी पीपीटी किटच्या संदर्भात, औषधाच्या संदर्भात ज्या पध्दतीने मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी ज्यांनी जागतिक महामारीच्या काळामध्ये आपली जबाबदारी समजून या देशामध्ये प्रत्येक नागरिक हा त्यांचा पाल्य समजून ज्या पध्दतीने काम केले. आणि प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्था यांना देण्यात आलेल्या निधीतून अपहार होणार असेल, त्या निधीचा गैरव्यवहार होत असेल तर ते निश्चितपणे या देशासाठी, सर्वसामान्य जनतेसाठी अत्यंत चुकीचे धोरण आहे. ज्या वेळेला या महानगरपालिकेत आयुक्त म्हणून मुंढे साहेब होते ते वारंवार अशा त-हेने सर्वसामान्य जनतेच्या, पदाधिकारी आणि प्रशासकीय  दडपशाहीचा प्रयत्न केला  त्यात करोडोची अनियमितता झालेली आहे. जर ते राधाकृष्ण सतसंग कोव्हीड सेंटर असेल त्यामध्ये ५५० रुपये प्रत्येकी रुग्णाच्या जेवणावर खर्च दाखविलेला निधीअसेल तो प्रशासकीय निधीचा अपहार आहे असे मी समजतो. मागचा कोव्हीड काळ चर्चेला गेले. सगळया पध्दतीचे प्रश्न बाजूला सारुन आमची प्राथमिकता काय होती.

नागपूर शहरातील प्रत्येक रहिवाश्यांचा जीव वाचविणे ,महानगरपालिकेची क्षमता आणि आपल्या मर्यादेची ओळख ठेवून शक्य तितकी मदत होईल त्या साठी औषधे खरेदीचे काम असेल. तत्कालीन महापौरजी मा.संदीपजी जोशी यांनी अत्यंत वाखाजण्याजोगे काम केले. आणि सन्माननीय महापौर साहेब आपण महापौर म्हणून जो कार्यभार नागपूर महानगरपालिकेचा सांभाळला आणि जी धुरा आपण आपल्या खांदयावर घेतली ती वाखाजण्याजोगे आहे. आज कोरोनाच्या संकट संपलेले नाही आणि ज्या पध्दतीने आपण स्व:त आणि तसेच मा.आयुक्त राधाकृष्णन साहेब ज्या पध्दतीने काम करीत आहे. मला या शहराचा नागरिक म्हणून अभिमान वाटतो की ज्या पध्दतीचे काम शासकीय आणि प्रशासकीय स्तरावर होत आहे ते वाखाजण्याजोगे आहे. नागपूर शहरातील प्रत्येक माणसाची काळजी घेतली आहे. प्रशासकीय अधिकारी आणि अनेक नगरसेवक, अनेक लोक जे घरात बसले होते आणि आपल्या महानगरपालिकेच्या चतुर्थ श्रेणीच्या कर्मचा-यांनी जे काम केले ते अत्यंत वाखाजण्याजोगे आहे. मा.महापौरजी, या स्थगण प्रस्तावावर झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपाची चौकशी करा, याबद्दल निश्चित काही म्हणणे नाही परंतु या स्थगण प्रस्तावाला माझा विरोध यासाठी आहे. या स्थगण प्रस्तावाच्या अनुषंगाने ज्या पध्दतीने भ्रष्टाचाराचे आरोप त्यांनी केली त्या पध्दतीचे भ्रष्टाचाराचे समर्थन मुळात करता येत नाही. परंतु ज्या पध्दतीची चौकशीची मागणी त्यांनी केली आहे त्या चौकशीला माझा विरोध आहे. मा.महापौरजी, त्या चौकशीला माझा विरोध यासाठी आहे. कारण आम्ही स्व:त सक्षम आहोत, आम्ही स्वायत्त संस्था आहोत. आभाताई पांडे यांच्या मागणीच्या संदर्भात खरे तर मला आश्चर्य वाटते. जरी त्या तत्कालीन स्वतंत्र निवडून आल्या तरी त्या आता सत्ताधारी पक्षाच्या पदाधिकारी आहेत. जर त्यांना असे वाटत असेल तर विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून, महानगरपालिकेच्या अधिका-याच्या एखाद्या पध्दतीने भ्रष्टाचार झाल्याचे वाटत असेल तर त्या निश्चितपणे आपल्या पक्षाकडे, सरकारकडे दाद मागू शकतात. मा.महापौरजी, आपण या भ्रष्टाचाराच्या संदर्भाने निश्चितपणाने चौकशी केली पाहिजे असे माझेही मत आहे. ती चौकशी महानगरपालिकेच्या जेष्ठ नगरसेवक असतील, पदाधिकारी असतील, किंवा एखाद्या आपल्या सगळयांना मान्य असलेला निवृत्त न्यायाधिश किंवा निवृत्त अधिकारी असतील त्यांनी डेप्युट करुन चौकशी करण्याचे अधिकार या सभागृहाचे आहेत. माझी विनंती या प्रसंगी मा.महापौरजी एवढीचआहे की या पध्दतीची अनियमितता आणि भ्रष्टाचार या सगळया खरेदी व्यवहारात अनेक प्रकारची तत्कालीन आयुक्त मुंढे साहेबांच्या काळात झालेली आहे. अनेकदा ती जनतेच्या समक्ष मांडण्यात आली आहे. या भ्रष्टाचाराची चौकशी करावी अशी विनंती करतो परंतु या स्थगण प्रस्तावाचा विरोध करीत असतांना विभागीय आयुक्तांच्या निदर्शनास किंवा विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनामध्ये अशा पध्दतीच्या चौकशीची गरज नाही. माझ्या प्रस्तावावर विचार करावा अशी विनंती करतो मा.महापौरजी आणि येथे थांबतो. धन्यवाद.

श्रीमती मंगला लांजेवार:- मा. महापौरजी, आभाताईने जो स्थगण प्रस्ताव ठेवलेला आहे त्याला मी समर्थन करते. आभाताईने या विषयामध्ये जे आरोप त्यांनी लावलेले आहेत, जी अनियमितता झालेली आहे. या विषयी आपण चौकशी करावी. कोव्हीड-१९ या व्यवस्थेकरिता जो निधी आलेला होता. त्यात

अनियमितता झालेली आहे त्या पुर्ण विषयाची चौकशी आणि विषयावर जी आभाताई यांनी मागणी केलेली आहे त्या प्रस्तावाला मी मंजुरी प्रदान करते आणि चौकशी करावी ही विनंती आहे. मला बोलू दिले त्याबद्दल धन्यवाद.

श्री.विजय झलके:- मा.महापौरजी, सर्वप्रथम मी मनपुर्वक आभार व्यक्त करतो की मला बोलण्याची संधी दिली. जेष्ठ नगरसेविका श्रीमती आभाताई पांडे यांनी जो स्थगण प्रस्ताव सादर केला त्यावर विस्तृत चर्चा आपल्या माध्यमातून होत आहे. मा.महापौरजी, सर्वप्रथम मी अभिनंदन मी यासाठी करेल की आभापांडे यांचे नेहमी सत्तापक्ष आणि महापौरावर आरोप राहिलेले आहेत. मात्र आज त्यांना विस्तृत मागणी आणि विस्तृत त्यांचे जे काही मनोगत होते ते व्यक्त करावयाचे होते. मी सर्वप्रथम आभाताई पांडे त्यांचे वक्तव्यातून प्रशासनाने कोव्हीड -१९ च्या काळात काय काय चुका केल्या, कशा कशा चुका केल्या, प्रशासकीय चुका कशा झाल्या, काही भ्रष्टाचार झाल्याचा आरोप त्यांनी लावला. अनेक गोष्टी त्यांनी आपल्या निवेदनात त्यांनी दिल्या आहे. पॅन्डामिकची सिच्युऐशन ज्यावेळी निर्माण झाली, कोरोनाची लहर ज्या वेळी या शहरात, आपल्या देशात आली. या कोरोना काळात हेल्थ विभाग कसे काम होते. या कोरोना सोबत कसे लढायचे हे कुणालाही माहीत नव्हते. ही सर्व कोरोनाची स्थिती हाताळण्याकरिता त्या वेळी प्रशासन, स्थायी समिती अध्यक्ष म्हणून मी असो किंवा मा.महापौरजी आपण सुध्दा, सर्व सहका-यांनी मदत करुन कोव्हीडच्या संकटावर मात करण्याचे काम केले.

महापौर:- मा.पिंटूजी आपकी आवाज स्पष्ट नही आ रही है।

श्री.महेंद्र धनविजय:- मा.महापौरजी,धन्यवाद.आपण मला बोलण्याची संधी दिली. कोरोनाच्या काळात मागच्या दीड वर्षापासून आपले अधिकारी पासून ते चतुर्थ श्रेणी कर्मचारी सर्वांनी आपल्या जीवाची बाजी लावून लोकांची सेवा केली आहे त्या सर्वांचे मी अभिनंदन करतो. या काळात प्रशासनातर्फे प्रशासकीय अनियमिततेच्या बाबतीत जो स्थगण प्रस्ताव जेष्ठ नगरसेविका आभाताई पांडे यांनी या ठिकाणी ठेवलेला आहे त्यात अनेक प्रकारची अनियमितता झाल्याची त्यांनी सांगितले आहे. निश्चितच हा प्रकार गंभीर आहे हा प्रकार महानगरपालिकेच्या अंतर्गत येणारा प्रकार आहे. आणि म्हणून ज्याप्रकारे फॉमेसुटिकल कंपनीकडून ए.सी. खरेदी करण्यात आले.पीपीटी किट विविध दराने खरेदी करण्यात आल्या आहेत. या अनेक गोष्टीमध्ये प्राथमिकदृष्टया असे वाटते की यात अनियमितता झालेली असल्याचे दिसत आहे. आजही जे लसीकरण सुरु आहे त्यामध्ये पॅरासिटोमल गोळी दयावी लागते ती केंद्रावर उपलबध नाही ते नागरिकांना परचेस करावे लागते. आज जो विस्तृत अहवाल देण्यात आला आहे त्यात पान क्र. ४ वरील १८ क्रमांकाच्या मुद्दयावर सांगितलेले आहे की लसीकरण केंद्रामध्ये ग्रीन शेड, सायडिंग,शेड स्टेशनरी, बॅनर हे सर्व एस.डी.आर.एफ. फंड मधून खर्च करण्यात येत आहे परंतु तक्ता नंबर ब मध्ये याबद्यलचा कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही आणि किती खर्च झाला, कुठे कुठे खर्च करण्यात आला याचे या तक्त्यामध्ये विवरण देण्यात आलेले नाही. मा.महापौरजी, माझे निवेदन आहे सीआर १८ नंबरमध्ये १४ जानेवारी २०२१ पासून लसीकरण केंद्रामध्ये किती खर्च झाला आहे, ज्या ज्या नगरसेवकांच्या क्षेत्रामध्ये लसीकरण केंद्र आहे त्याची माहिती प्रशासनाने संबंधित नगरसेवकांना ताबडतोब उपलब्ध करुन दयावी. जेणेकरुन नगरसेवकांचे मत

आपल्यापर्यंत पोहचेल. मा.महापौरजी, आज लसीकरण केंद्रावर अनेक प्रकारचा घोळ होत आहे. मी लसीकरण केंद्र सुरु केले आहे त्याची सगळी सुविधा मी केली आहे. मॅनपावर पासून कम्प्युटरची व्यवस्था सर्व केले आहे. महानगरपालिकेचा एकही पैसा खर्च झालेला नाही. परंतु मला अशी माहिती मिळाली आहे की माझ्या लसीकरण केंद्राच्या नावाने खर्च प्रशासनाने दाखविलेला आहे. ही गंभीर बाब आहे. हा जो प्रस्ताव आभाताई पांडे यांनी मांडला यामध्ये निश्चितच महानगरपालिकेच्या स्तरावरील चर्चेचा विषय आहे. मा.महापौरजी, मी विनंती करतो की महानगरपालिकेच्या स्तरावर समिती गठीत करुन निश्चित कालावधीत त्याची चौकशी करुन त्वरीत याचा अहवाल येणा-या काही दिवसात दयावा जेणेकरुन प्रशासकीयअनियमितता पुढे होणार नाही याची दक्षता घेतली तर बरे होईल. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मा.महापौरजी आपल्याला खुप खुप धन्यवाद देतो.

श्रीमती नंदा जिचकार:- या सभेमध्ये मा.महापौरजी, आयुक्त, पदाधिकारी आणि सर्व नगरसेवक. सर्वप्रथम मी आभाताई पांडे यांनी हा स्थगण प्रस्ताव मांडला. हा स्थगण प्रस्ताव मागच्या सभेमध्ये मांडला होता. मी सत्तापक्ष नेते श्री. अविनाश ठाकरे यांचे अभिनंदन करेल की त्यांनी विस्तृत चर्चेसाठी सभा बोलवावी अशी मागणी केली आणि आपण ती त्वरित मान्य करुन चर्चा घडवून आणली. आपल्याला माहीत आहे या कोरोनाच्या पेन्डामिकच्या सिच्युऐशन मध्ये भारतीय जनता पक्षाचे जे महापौर आहेत. त्यांच्या नेतृत्वामध्ये अत्यंत चांगले काम केलेले आहे. त्याबद्दल मा.महापौरजी आपले अभिनंदन करते की इतक्या कठीण परिस्थितीत सुध्दा नागपूर शहराला आज स्थैर्य लाभलेले आहे. आज बघितले तर कोरोनाचे पेशंट कमी झालेले आहेत आणि नागपूर शहरातील नागरिकांना दिलासा मिळालेला आहे. हे खरोखरच कौतुकास्पद आहे याकरिता मी नागपूर शहराचे महापौर यांचे मनपुर्वक अभिनंदन करते. आपल्याला माहीतच आहे या कोरोना काळामध्ये प्रशासनावर किती ताण होता मी विशेषत: राम जोशी यांचे जे अति.आयुक्त आहेत त्यांचे अभिनंदन करेल की त्यांनी सुध्दा ही परिस्थिती उत्तमरित्या सांभाळली. परंतु अशा अवस्थेत काही अनियमितता आहेत त्या मा.सदस्यांनी आपल्या निदर्शनास आणून दिल्या त्या अनियमिततेकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. दीड वर्षापासून संपुर्ण प्रशासन सर्व नगरसेवक एक प्रेशरमध्ये काम करीत आहे. आपल्या यानागपूर शहरामध्ये आपल्याला माहीत आहे. अनेक लोक मृत्यूमुखी पावलेले आहे. या प्रेशरमधून रिलीफ झाल्यानंतर ती चर्चा आहे. त्या चर्चेच्या माध्यमातून एक दिलासा आपले मत व्यक्त करण्याची संधी आपण उपलब्ध करुन दिली त्याकरिता मी आपले मनपूर्वक आभार मानते. अनेक गोष्टीमध्ये अनियमितता दृष्टीस पडत आहे. मला असे वाटते की आपल्या नागपूर महानगरपालिकेने भ्रष्टाचाराचे आरोप, अनियमिततेचे आरोप यातून बाहेर यायला पाहिजे. आज कोरोनाने दाखवून दिले आहे की किती पैसा असला तरी कोणत्याही कामात येत नाही. करोडो रुपये घेवूनही जीव वाचवू शकत नाही हे कोरोनाने दाखवून दिले आहे. अशा या परिस्थितीत सुध्दा कुणी पैश्याच्या लालसेने भ्रष्टाचार करीत असेल तर हे निंदनीय आहे. या अशा परिस्थितीमध्ये मला असे वाटते आयुक्तांनी सुध्दा याच्यावर संपुर्ण ताबा असला पाहिजे. प्रत्येक गोष्टी आयुक्तांच्या लक्षात यायला पाहिजे. मा.महापौरजी

यांचे मार्गदर्शन या संपुर्ण नागपूर शहराला लाभत असते. सध्या लसीकरणाचा अत्यंत महत्वाचा विषय या नागपूर शहरामध्ये सुरु आहे. काही सेंटर जे अॅन्टीजेन्ट टेस्टचे सेंटर होते ते काही ठिकाणी सुरु आहेत तर काही ठिकाणी बंद झालेले आहेत. असे लक्षात आले आहे की या अॅन्टीजेन्ट टेस्ट सुध्दा बोगस चालू आहेत. कुठे कुठे आकडा चुकीचा आहे तर कुठे कुठे नावे, पत्ता सुध्दा बोगस बसतात असे माझ्या कानावर आले आहे. मला असे वाटते की अधिका-याने असा भ्रष्टाचार करु नये. भ्रष्टाचार माणसाला कुठेही तारत नाही. ही महानगरपालिका आहे, पालन करणारी संस्था आहे. ही पालन करणारी संस्था ही माता आहे. या शहरात असे काही अधिकारी ज्यांचे नाव घेतांना, कोणत्याही गोष्टीचा आरोप करीत असतांना पुफ्र देणे अत्यंत आवश्यक आहे आणि अशा परिस्थितीत अधिका-यांनी स्व:ताच्या मनाला विचारावे. या पदावर आहे आणि मला जर या पदावर भगवंताने लोकांचे सेवा करण्याचे जर काम दिलेले आहे आणि त्यामध्ये मी जर भ्रष्टाचार करीत असेल तर देवाच्या दारी आपल्याला जायचे आहे आणि देव आपल्याला  कधीही माफ करणार नाही. मी मनापासून भावना व्यक्त करते की प्रशासनात कोणताही भ्रष्टाचार असेल तर तो ताबडतोब दूर व्हायला पाहिजे. कारण रिटायर्ड झाल्यानंतर अधिका-याने मागे बघितले तर त्याला समाधान दिसायला पाहिजे की मला काम करण्याची संधी मिळाली त्या कामाचे मी सोने कले. महानगरपालिकेत जर मला नोकरी मिळाली आहे तर चांगले काम करुन गेले पाहिजे. मग तो कोणताही विभाग असो, आरोग्य विभाग असो, पीडब्लूडी विभाग असो, या पॅन्डेमिक् काळात महानगरपालिका असो, पोलीस विभाग असो, हेल्थ विभागाच्या ज्या लोकांना जनतेची सेवा करण्याची संधी म्हिाली त्यांनाच कोरोना वॉरीयर्स म्हणून त्यांनाच मान मिळाला आहे. असे याच्यामध्ये २० लोक आहेत याच्यामध्ये किती लोकांना संधी मिळाली, किती लोकांनी फुकट पगार घेतलेला आहे. कोरोनामध्ये सेवा दिलेली नाही त्यांना आयुष्यात कोणतेही समाधान मिळणार नाही. महाराष्ट्र शासनाने अनेक लोकांना फुकट पगार दिला आहे. मात्र महानगरपालिकेतील प्रत्येक अधिकारी, कर्मचा-यांना आज जो काही मोबदला दिला आहे त्यांनी ती सेवा देवून घेतलेला आहे. आजच्या प्रसंगी मला एवढेच सांगावयाचे आहे महानगरपालिका जी आहे ती या भ्रष्टाचाराच्या आरोपातून कधी मुक्त होणार आहे. कधी महानगरपालिकेचे नाव वर येणार आहे. आज जी चर्चा घडवून आणलेली आहे या चर्चा सुध्दा आपल्या मनाला विचारावे की किती दिवस चालणार आहे. प्रशासनात या शासननात भ्रष्टाचार किती दिवस चालणार आहे. आज आपल्याला संधी मिळाली आहे, आपल्याला लोकांचे आशीर्वाद घ्यावयाचे आहेत. अत्यंत मन खिन्न होते की अशा भ्रष्टाचाराच्या आरोपासाठी ही चर्चा करण्यात येत आहे ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे. माझी एवढीच विनंती राहील की आज अधिकारी असो, कर्मचारी असो की या प्रशासनातील कोणताही व्यक्ती असो, त्या व्यक्तीने या महानगरपालिकेचा भ्रष्टाचार हा तडीपार करायला पाहिजे आणि लोकांना सेवा दिली पाहिजे. आज मा.महापौरजी यांच्या नेतृत्वामध्ये ही महानगरपालिका चालत आहे. मा.महापौरांनी खुप कष्ट घेतले आहे. अधिका-यांनी कष्ट घेतले आहे. त्यामुळे नागपूर शहरामध्ये शांतता दिसत आहे. आजच्या प्रसंगी ज्या व्यक्तीने खरोखराच कार्य केले, ज्यांनी सेवा दिली त्यांचे मनापासून मी अभिनंदन करते. नागपूर महानगरपालिका नावारुपाला यावी अशी आशा व्यकत करते. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल

आभार व्यक्त करते. धन्यवाद.

श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, सर्वप्रथम मी आपले आभार व्यक्त करतो की आपण मला बोलण्याची संधी दिली. मा.महापौरजी, मा.आभाताई यांनी त्यांच्या वक्तव्यामध्ये संपुर्ण माहिती दिली की प्रशासनाने काय काय केले, कोरोनाच्या स्थितीमध्ये प्रशासकीय अनियमितता कशी केली. त्यांच्या अनेक ट्रम झाल्या त्यांना अनेक काळापासून जी बोलण्याची संधी मिळत नव्हती असे त्यांचे आरोप होते. आज त्यांना बोलण्याकरिता भरपूर संधी मिळाली आहे. या कोरोनाचे संकट हे अचानक आले. हे संकट सर्वांसाठी नवीन होते आणि अचानक आलेले हे संकट या शहरात, या देशात जेव्हा येते तेव्हा जसा एखादे आक्रमण झाले आणि जशी स्थिती निर्माण होते तशी स्थिती या शहरात निर्माण झाली. मा.महापौरजी, आजच्या या स्थगण प्रस्तावावर तोच विषय मा. आभाताई पांडे यांनी मांडला. अनेक चुका झाल्या असतील त्याचे समर्थन केले पाहिजे असे नाही. परंतु जेथे काम होते तेथे चुका होतात असे माझे वैयक्तिक मत आहे. प्रशासनाने जर कोरोनाच्या संकटासोबत जर कुणी कार्य केले असेल तर तो सेनापती म्हणून राम जोशी अति.आयुक्त यांनी या कोरोनाच्या संकटाच्या काळामध्ये एकमेव व्यक्ती असे आहेत जे पहिल्या दिवसापासून प्रशासनाच्या सर्व बाबींचा प्रशासनीक सर्व प्रोजेक्टमध्ये तत्कालीन जी कोव्हीडची जी संख्या आली ती काल ११ होती. ७९९९ पर्यंत ही संख्या गेली होती. अनेक लोकांचे मृत्यू झाले, या संकटाच्या काळात ख-या अर्थाने प्रशासनाने लढाई लढली. आपल्या नेतृत्वात लढाई लढली. लढाई लढत असतांना प्रशासनाचे सुध्दा तेवढेच कौतुक केले पाहिजे. जेथे चुक झाली, तेथे चुका दुरुस्त केले पाहिजे. जेथे भ्रष्टाचार झाला असेल त्याची चौकशी करण्याची गरज आहे. मात्र कामच करणार नसेल तर निश्चितपणे चुका होणार नाही. जर काम करीत असेल तर चुका होतील असे माझे वैयक्तिक मत आहे त्यामुळे प्रशासकीय घाईगडबडीमध्ये ज्या चुका झाल्या असतील त्या निश्चितपणे दुरुस्त केल्या पाहिजे. त्या रेक्टीफाय केल्या पाहिजेत आणि अशा चुका भविष्यात होणार नाही याची काळजी प्रशासनाने घेतली पाहिजे. तेथे भ्रष्टाचार झाल्याचा संशय मा.आभाताई पांडे यांचा आहे त्याची योग्य चौकशी करण्याची गरज ती प्रशासनाच्या माध्यमातून किंवा आपल्या माध्यमातून, जे प्लेटफार्म उपलब्ध आहेत त्या माध्यमातून ती योग्य चौकशी केली पाहिजे. मात्र मा.महापौरजी, ज्या लोकांनी कोव्हीडच्या संकटात ज्या वेळी माणुस माणसाला भेटत नव्हता त्यावेळी या प्रशासनातील लोकांनी काम केलेले आहे. काही शुल्लक लोक असतील ज्या लोकांमुळे बाकी सगळयांना ठरविणे ते योग्य होणार नाही. या प्रशासनाने आज कोव्हीड संकटावरुन आपण आज ११ च्या संख्येवर पोहचलेलो आहे. निश्चितच शुन्य संख्या होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे आणि म्हणूनच आपल्या आयुक्तापासून सर्व अधिकारी, कर्मचा-यांना आपण सलाम केला पाहिजे. कोव्हीडच्या या संकटामध्ये ज्यावेळी प्रशासनाने घरोघरी जावून सर्व्हे केला प्रशासनाच्या या कामासाठी मी आज या सभागृहात एक अभिनंदन प्रस्ताव मांडू इच्छितो. कोव्हीडच्या संक्रमणाच्या काळामध्ये आपल्याप्रशासनाने उत्तम कार्य केले. त्या सर्व क्लास फोरचे कर्मचारी, आशा वर्कर पासून आपल्या आयुक्तापर्यंत क्लास वन अधिका-यांपर्यंत सर्वांनी उत्तम कार्य केले आहे. मी आपणांस विनंती करतो. मा.सभागृहाने मान्यता प्रदान करावी. मा.आभाताई पांडे यांनी राम जोशी

यांच्यावर आरोप लावलेले आहेत. मी कुणाची बाजू घ्यायला बसलेलो नाही. रामाला सुध्दा वनवासात जावे लागले होते. राम जोशी यांच्या हातून काही चुका झाल्या असेल, प्रशासनातील काही अधिका-यांनी जर चुका केल्या असेल तर निश्चितपणे त्या चुका अनावधाने झाल्या असतील. त्यावेळी सिच्युएशनची अशी होती की त्या पेन्डामीक सिच्युऐशन मध्ये काही चुका निश्चितच झाल्या असतील. त्याचे समर्थन मी करणार नाही. त्या चुका जर दुरुस्त होत असतील तर त्या चुका दुरुस्त कराव्यात. अशा चुका भविष्यात होणार नाही याची काळजी घेण्याची गरज आहे. आजच्या या आभाताई पांडे यांच्या स्थगण प्रस्तावावर मी त्यांचे निश्चितपणे समर्थन करणार नाही. ज्या काही चुका झाल्या असतील त्याची निश्चितपणे चौकशी करुन त्याची योग्य तपासणी करुन त्याकडे वाटचाल केली पाहिजे. मा. महापौरजी, आपण मला बोलण्याची संधी दिली मी मनापासून आपले आभार मानतो आणि आपले दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

श्री.प्रकाश भोयर:- सन्माननीय महापौरजी, आभाताई पांडे यांनी स्थगण प्रस्ताव या ठिकाणी मांडला. अनेक प्रकारच्या चुका, अनेक प्रकारचे आरोप त्यांनी केले त्यांच्या पध्दतीने ते बरोबर असतीलही. मा.महापौरजी, मागच्या वर्षी मार्च महिन्यात पासून आपल्या या नागपूर शहरात एक प्रकारची चीड आयुक्ताच्या माध्यमातून या नागपूर शहरात होती. त्यावेळचे आयुक्त होते मा.तुकाराम मुंढे साहेब होते. मा.महापौरजी, त्या काळामध्ये सर्वांनाच जे नगसेवक असतील, पदाधिकारी असतील ते चोर समजले जात होते. परिस्थिती अशी होती. की पुर्ण अधिकारी वर्ग हा प्रेशरमध्ये होता. या प्रेशरमध्ये किंवा त्यांना जे आदेश दिले होते ते काम झालेच पाहिजे ते कोणत्याही पध्दतीचे असो. कोणत्याही वेळेवर असो. ते झाल्यानंतर जर कामात कमी जास्त झाले तर त्याचे काटे कर्मचा-यांवर उगवायचे आणि वॅाटअपवर त्यांनी जे काम केले हे सगळयांना माहीत आहे. राबीनहुड सारखे, मसिहा सारखे रोज वर्तमानपत्रामध्ये, पत्रकारांना घेवून स्वत:चे इंटरव्हयू घेवून प्रकाशात दिसत राहण्याचे काम त्यांनी केले आहे. आज आपण काम करीत आहे. आज एप्रिल महिन्यात फार मोठया प्रमाणात कोव्हीडची दूसरी लाट मध्ये मा.आयुक्तांनी काम केले आहे. कुठेही संघर्ष झाला नाही. आयुक्त आणि पदाधिकारी मध्ये संघर्ष झालेला नाही. परंतु १४ वर्षामध्ये य१६ बदल्या झालेला हा कर्मचा-यांना एका नोकरासारखा मी आपले वाक्य सांगतो, नोकर तर ते आहेतच. परंतु आपल्याच माध्यमातून तो अलीबाबा असा होता की त्यांच्या आदेशाच्या माध्यमातून अनेक गोष्टीत त्यांचे बाहेरचे ठेकेदारही या नागपूर शहरामध्ये काम करीत होते. स्टॅन्डींग मध्ये त्यांनी २४ लक्ष ९० हजार रुपयाचे अनेक कामे त्यांनी येवू दिले नाही. अनेक लाखोचा भ्रष्टाचार या व्यक्तीच्या माध्यमातून झालेला आहे. त्याच्यावर असलेला प्रेशर सर्वात जास्त प्रेशर त्या खाली हे कर्मचारी दबले गेले होते. पेन्डॉमीक काळामध्ये जे कोरोनाचे पेशंट होते ते २ लक्ष, ७ लक्षावरती गेले होते. त्या वेळोवेळी प्रसंगी वस्तुच्या किंमती वाढत होत्या. त्या एखादा गोष्टीमध्ये कर्मचा-यांच्या माध्यमातून कोणाला दोष द्यावयाचा असेल तर जर कुणी दोषी असेल तर पुर्वीचे आयुक्त ज्याला तुम्ही, आम्ही या नागपूर शहरातून प्रस्थान हालवायला लावले. हा सर्वचा सर्व दोष त्या आयुक्ताला दयावा असे मला वाटते. या आभाताई पांडे यांच्या स्थगण प्रस्तावाला मी समर्थन करणार नाही परंतु ज्या थोडया फार चुका झाल्या असतील. जाणूनबुजून झाल्या असतील असे वाटत नाही परंतु झाल्या असतील तर त्याची काळजी करावी.

करावयाचे असेल तर त्यांच्या कामाची मागच्या वर्षभरात मी लक्ष्मीनगर झोनचा सभापती होतो. सभापतीच्या माध्यमातून या लक्ष्मीनगर झोनमध्ये काम करीत होतो. या प्रशासनाने काय काय चांगले काम केले त्याची यादी मी देवू शकतो. इतक्या मोठया प्रमाणात चांगले काम केले आहे. एखाद्या मास्टर माईंड माणसाने चुकीचे काम केले असेल तर संपुर्ण प्रशासनाला दोषी ठरविता येणार नाही. कोव्हीड काळामध्ये सॅनीटायझर करण्यासाठी १०० -१०० टाकी आम्ही या प्रशासनाला सॅनीटाईजर करण्याकरिता पाठवित होतो. सॅनीटायझर करुन ती निश्‍चित पणे वापस येत होती. ज्या ज्या घरी सर्व्हे केला जात होता काही लोकांचा या पेन्डॉमीक काळामध्ये घरातील लोकांचे जीव सुध्दा गेले आहे तरी सुध्दा त्यांनी काम केले आहे. आपले कर्तव्य चांगल्या पध्दतीने निभावले आहे. त्याकरिता सर्व लोकांना दोषी ठरविता येणार नाही. जर दोषी ठरवायचे असेल तर मागचे जे आयुक्त आहेत त्यांना दोषी ठरवावे अशी माझी अपेक्षा आहे. धन्यवाद मा.महापौरजी.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, सन्माननीय नगरसेविका आभाताई पांडे यांनी जो स्थगण प्रस्ताव मांडला आणि त्याच्यावर आपण चर्चा सुरु केली त्या निमित्ताने कोरोना महामारीचा प्रकोप हा पहिल्यांदा भारतामध्ये आणि आपल्या शहरामध्ये निर्माण झाला आणि त्याच्यामध्ये या काळामध्ये कर्मचारी, अधिकारी, पदाधिकारी या सर्व लोकांनी चांगले काम केले आहे. काम करीत असतांना लोकांकडून चुका होतात. जे काम करतात त्यांच्या हातून चुका होणे स्वाभावीक आहे. ज्यापध्दतीने आभाताई पांडे यांनी जो प्रश्न मांडला त्या प्रश्नावर पीपीटी किटच्या संदर्भात असो, औषधोपचारच्या संदर्भात असो, कोरोना महामारीच्या काळामध्ये नवीन हॉस्पीटल तयार करण्याच्या संदर्भात असो. या ठिकाणी अनेक प्रकारच्या खरेदी विक्रीच्या याच्यामध्ये त्यांनी निदर्शनास आणून दिले. ती तफावत फार मोठया प्रमाणात असल्याचे त्यांच्या चर्चेतून दिसून आले. या काळामध्ये आपल्या महानगरपालिकेच्या सगळया कर्मचा-यांनी फार मोठया प्रमाणात काम केले. त्यांचे अधिका-यांचे, पदाधिका-याचे आणि आपल्या नगरसेवकांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो की अचानक आलेल्या महामारीमध्ये भोजनदानाचे काम असो, अन्नधान्य वाटपाचे काम असो, नागरिकांना हॉस्पीटलमध्ये भरती करण्याचे काम असो किंवा ज्या ज्या अडचणी त्या काळामध्ये निर्माण झाल्या त्या निर्माण झालेल्या अडचणीमध्ये मदत करण्याचे काम पदाधिकारी आणि नगरसेवकांनी केले आणि आपल्या प्रशासनाने सुध्दा साथ दिली. त्याच्यामध्ये जे काम झाले त्यामध्ये चुका निश्‍चित झालेल्या आहेत परंतु त्या चुका कोणत्या प्रकारच्या चुका आहेत. खरेदीविक्रीमध्ये आभाताई पांडे यांनी भ्रष्टाचार झाल्याचे सांगितले आहे. असे खरोखरच झाले असेल तर निश्‍चितरुपाने सभागृहाला अधिकार आहे. आपण त्याठिकाणी त्याचेमध्ये निश्‍चित सभागृहाची चौकशी समिती निश्‍चित करुन त्यात जे आरोप झाले असतील त्याची चौकशी सभागृहाच्या माध्यमातून करावी. माझी या निमित्ताने मा.महापौरजी यांना विनंती आहे की आताही कोरोनाच्या काळामध्ये दुस-या लाटेमध्ये सुध्दा आपले आयुक्त, पदाधिकारी आणि सर्व लोकांनी चांगले काम केले आहे. परंतु या महामारीच्या काळामध्ये अनेक लोक मृत्यू पावले पुर्ण शहरामध्ये परिस्थिती आटोक्याच्या बाहेर गेली होती. शासनाने प्रयत्न केले, महानगरपालिकेने प्रयत्न केले आणि या परिस्थितीमध्ये आटोक्यात आणण्याचा पुर्ण प्रयत्न प्रशासनाने

केला. प्रशासनाला त्याच्यामध्ये यशही आले. आताचे आयुक्त आहेत मा.राधाकृष्णनजी यांनी या महामारीच्या काळामध्ये त्यांच्या सर्व सहका-यांनी चांगले काम केले त्याचे अभिनंदन करतो परंतु आता येणा-या दिवसामध्ये तिस-या लाटेचे वातावरण निर्माण झाले आहे. मा.पालकमंत्री आणि प्रशासनाने लॉकडाऊनची घोषणा जी ८ वाजेपर्यंत होती ती ४ वाजेपर्यंत पेंडामिक परिस्थितीमध्ये त्यांनी जाहीर केली. मा.महापौरजी, आपल्या माध्यमातून एक सुचना आहे.लहान मुलांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असा फ्ल्युचे इन्जेक्शन आणि फेजरचे इन्जेक्शन जे आपण मुलांना देतो ते पीएचसीमध्ये उपलब्ध नाही. आपल्या कडे ते इन्जेक्शन आहे ते ताबडतोब प्रशासनास निर्देश दिले आणि ते प्रशासनाने पीएचसीमध्ये पाठविले आणि याच्यामध्ये ही बाब वर्तमानपत्रात मध्ये दिली. आणि या लसी या लहान मुलांना दिल्या तर भविष्यामध्ये लहान मुलांना कोव्हीडपासून कंट्रोल करण्याकरिता होवू शकतो. या संदर्भात वर्तमानपत्रामध्ये न्युज वाचलेली आहे. या संदर्भात आपण जर निर्देश संबंधित अधिका-यांना दिले आणि व्यवस्था केली तर एक चांगल काम या दृष्टीने होईल. आभाताई पांडे यांनी जे काही आरोप केले त्या आरोपामध्ये अनेक ठिकाणी तथ्य दिसतात त्यामुळे यामध्ये सभागृहाची एक चौकशी समिती नियुक्त करावी आणि झालेल्या कारभाराची चौकशी करावी अशा प्रकारची मी आपल्याला विनंती करतो. महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी आणि आयुक्त आणि त्यांच्या सहकार्यांनी चांगले काम केलेले आहे, शासनाने चांगले काम केले आहे. ते चांगले काम केल्याबद्दल मी आभार व्यक्त करतो आणि याठिकाणी थांबतो. जयहिंद

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, मा.विरोधी पक्ष नेते, मा.स्थायी समिती अध्यक्ष, मा. आयुक्त साहेब आणि महानगरपालिकेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, नगरसेवक, महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी. गेल्या तीन तासापासून मा.आभाताई पांडे यांनी जो स्थगण प्रस्ताव या सभागृहात मांडला त्याच्यावर चर्चा सुरु आहे. ही लोकशाही इतकी सुंदर आहे की प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार या लोकशाहीने दिलेला आहे. आपली चांगली सभा सुरु आहे. ही चांगली गोष्ट आहे की ज्या वेळेला राजकीय क्षेत्रामध्ये आरोप प्रत्यारोप होतात तर ते विरोधी पक्षाच्या पदाधिका-यांवर होतात. पक्षाच्या पॉलीसीवर होतात परंतु आज या सभागृहात जी चर्चा सुरुआहे. प्रशासनाच्या कारभारवरती चर्चा सुरु आहे. प्रशासनाच्या त्रुटीवरती चर्चा सुरु आहे. आपले संविधान इतके सुंदर आहे की कोणीही कधीही निर्णय घेतला तरी त्याची नोंद घेतल्या जाते, त्याची दखल घेतल्या जाते आणि ज्या वेळेला वेळ असेल त्या वेळेला त्याच्यावर चिंतन होवून त्यातून सामुहीक मंथन निघते आणि जे घडते ते चांगले असते. ही लायबल सिस्टम या संविधानाने तयार केलेली आहे, देखरेख प्रणाली तयार केली आहे. या देखरेख प्रणालीच्या माध्यमातून प्रत्येकाला उत्तरदायी सुध्दा ठरविले जाते. आपल्या मनमर्जीने वागणा-यांना या सर्व प्रक्रियेतून कधी ना कधी जावे लागते. या प्रक्रियेतून गेल्यानंतर ते काही खुप मोठे नाही आहेत आणि इतर खुप काही लहान नाही अशा प्रकारच्या काही गोष्टी त्यातून सिध्द होतात. आजच्या चर्चेतून अशाच प्रकारचा सुर मा. नगरसेवकांच्या माध्यमातून आलेला आहे. मागे पाच दिवस सभागृह चालले होते आणि मी विषय मांडला होता महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये कलम १०२ आहे. हे कलम याकरिता बनविले आहे जे काही निर्णय प्रशासन त्या त्या परिस्थितीत घेत असते ते निर्णय महानगरपालिकेच्या पटलावर

आले पाहिजे. महानगरपालिकेला माहीत असले पाहिजे. याचे कारण असे आहे जे जनप्रतिनिधी आहेत त्यांचे दायित्व नगरसेवकांचे आहे. जनप्रतिनिधी म्हणून ते या शहराचे विश्वस्त आहेत. मोठया विश्वासाने या विश्वस्तांना या शहरातील जनतेने सभागृहामध्ये त्यांच्या रोजच्या येणा-या निकडीच्या बाबीं आहेत त्या बाबींवर देखरेख ठेवणे आणि त्यांना होणा-या त्रासापासून मुक्तता करण्यासाठी त्यांना विश्वस्त म्हणून या महानगरपालिकेत, हे सभागृह विश्वस्त मंडळ आहे ते या सभागृहापुढे यावे. कलम १०२ मध्ये तरतूद आहे महापालिकेच्या सभागृहात घेतलेली आहे परंतु दुर्दैवाने जे घडत गेले दोन वर्षाच्या कालखंडामध्ये वारंवारं सुचना देवूनही सभागृहाच्या या कलमाला केराची टोपली दाखविली आणि कुठल्या प्रकारची माहिती सदनामध्ये ठेवली नाही त्याच्यामुळे संभ्रम तयार होत गेला. त्याच्यामुळे अनेक गोष्टी बाहेरुन कळतात, अनेक गोष्टी आतमधून कळतात. कोणती माहिती योग्य, कोणती माहिती अयोग्य. कारण वास्तविकता आणि परिस्थिती या दोन वेगवेगळया गोष्टी आहेत. जर वेळोवेळी या गोष्टीचा ऊहापोह होत गेला तर संभ्रमाची परिस्थिती निर्माण होत नाही. आज आपण सभागृहातील चर्चेच्या माध्यमातून या संभ्रमापर्यंत पोहचलेलो आहे. आभाताई पांडे यांनी अत्यंत गंभीर असे आरोप प्रशासनावर केले आहे. परंतु सभागृहाचा सुर वेगळया पध्दतीचा दिसत आहे. सदनातील जेष्ठ पदाधिकारी आणि सदस्यांचे असे मत आहे की चुका घडतात, अशा घटना घडतात त्याच्यापुढे या सगळया प्रकरणांची दखल वेगळयापध्दतीने घ्यावी. वेगळया पध्दतीने निर्णय घ्यावा असे मा.सदस्यांचे मत आहे. हा विषय मांडला, माझे मत असे आहे की दोन वेळेला याचे निर्णय झाले आहेत २९.०४.२०२० आणि ०५.०५.२०२० जिल्हा नियोजन समिती, जिल्हा स्तरीय व्यवस्थापन समिती तयार करण्यात आली होती. त्या समितीत जी माहिती जी काही आदेश झाले होते त्या कार्यकाळात २९.०४.२०२० आणि ०५.०५.२०२० या दोन्ही वेळेला अधिकारी वेगवेगळे होते. पहिल्या वेळेला मा.तुकाराम मुंढे होते ते आपल्या महानगरपालिकेत नाही ते दुस-या ठिकाणी गेले आहेत. त्या आदेशाच्या वेळेला त्या प्रक्रियेच्या वेळेला २९.०४.२०२० चे आहेत. ही सर्व माहिती आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारीणीच्या अंतर्गत आली होती. मा.महापौरजी, एक-एक मुद्दयाचे वाचन करीत गेले तर मा.महापौरजी, बरेच ठिकाणी लक्षात येईल की अहवालाचा मुद्दा क्रमांक २ मध्ये दिले आहे की एजी मार्फत लेखा परीक्षण करण्यात येणार आहे. जेव्हा की एक फायनांसियल इअर संपून गेले आहे. २०२०-२१ चे फायनांसियल इअर मार्च मध्ये संपून गेले आहे आणि २०२१-२२ चे फायनांसियल इअर सुरु आहे. मग २०२०-२१ चे फायनांसियल इअरचे लेखा परिक्षण कां करण्यात आले नाही. हा एक मुद्दा लक्षात येतो. कारण हे जर लेखा परिक्षणाचा अहवाल सभागृहाच्या पटलावर आला असता तर मा.नगरसेवकांच्या मनामध्ये कोणताही संभ्रम आला नसता. २४.०३.२०२० चा अहवालामधील पॅराग्राफ क्रमांक ३ मध्ये नमुद २४.०३.२०२०ला नागपूर शहरामध्ये नव्हे तर संपुर्ण देशामध्ये संचार बंदी लागू करण्यात आली होती. नागपूर शहरामध्ये कोरोनाचा उद्रेक झाला होता तेव्हा संपुर्ण अधिकारी, पदाधिकारी यांना जबाबदारी सोपविण्यात आली होती. नागपूर शहरात तसेच संपुर्ण देशात संचारबंदी लागू करण्यात आली होती बाजारपेठेत आवश्यक, अत्यावश्यक कंझुमर आयटंम्स औषधी व साहित्य उपलब्ध नसल्याने तसेच बाजारपेठ बंद असल्याने अत्यावश्यक वस्तु व साहित्य मिळणे शक्य नव्हते. मा.महापौरजी, जेव्हा सर्व

भारतामध्ये लॉकडाऊन लागू झाला. त्यावेळेला जीवनावश्यक वस्तु सोडून बाकी सगळे लॉकडाऊन होते. जीवनावश्यक साहित्य, औषधाचे साहित्य हे सगळे ओपन होते. अत्यावश्यक जीवनावश्यक साहित्य सोडून सर्व लॉकडाऊन होते. प्रशासन अशी माहिती देते की, मा.महापौरजी ऐका, २४.०३.२०२० च्या आदेशामध्ये हे कोणाच्या कालखंडामध्ये दिल्या गेले आहे हे सगळयांना माहीत आहे. मी सभागृहाची चर्चा ऐकुन राहिलो. हया फाईली मी जेव्हा वाचल्या, २५० च्यावरती, २५८ च्यावरती वाचल्या. मा.आभाताई पांडे यांनी सुध्दा फाईली वाचल्या.. फाईली वाचल्यानंतर प्रत्येक आदेश, प्रत्येक तारीख महत्वाची आहे मा.महापौरजी. २९.०४.२०२० वेळेस या सगळया गोष्टी घडलेल्या आहेत. मुद्दा क्र. ३ मध्ये शेवटच्या दोन लाईनी आहेत. उक्त बाबी खरेदीकरिता जिल्हा स्तरीय समितीने सुध्दा सभेच्या इतिवृत्ताला मान्यता दिलेली आहे मा.महापौरजी. इतिवृत्त केव्हा येते ज्या वेळेला सभा होवून सभेमध्ये प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. खरेदी नंतर ती माहिती देण्यात आली ते इतिवृत्तात आहे. इतिवृत्तात त्याला मान्यता देण्यात आली आहे मा.महापौरजी. मुद्दा क्रमांक ४ वरती बोलणार नाही तो नवीन आयुक्तांच्या कार्यकाळातील मुद्दा आहे. त्यामुळे मला त्याच्यामध्ये काही वाटले नाही. मुद्दा क्रमांक ५ (वाचले) हा सुदधा आपण कॉलम पाहिला तर पहिल्या वेळेस ज्या वेळेला आपण सीसीसी विलगीकरण केंद्र तयार केले होते.त्यानंतर आपली हळूहळू प्रोसेस सुरु झाली. जेव्हा शासनाचे निर्णय आले तेव्हा आपण गृह विलगीकरण केंद्र निर्माण करणार आहोत आणि विलगीकरणाच्या वेळेला कोणत्याही प्रकारची खरेदी होणार नाही, कोणतीही व्यवस्था करण्याची गरज पडली नाही. मुद्दा क्र. ५ सुध्दा आपला पहिला २०.०४.२०२० चा जो आदेश आहे, पहिल्या आयुक्तांच्या काळातील जे कार्य आहे त्यांच्या काळातील हा मुद्दा क्रमांक ५ आहे. त्या काळचे सर्वच्या सर्व वर्तमानपत्र जर आपण उचलून पाहिजे तर विलगीकरणामध्ये कशाप्रकारची जेवणाची व्यवस्था होती, कशा प्रकारची चहाची व्यवस्था होती. कशी व्यवस्था होती, काय व्यवस्था होती याची वर्तमानपत्रातून तुंडुंब माहिती काढून देवू शकतो. कशा प्रकारे काम झाले हेही त्या ठिकाणी आपण सांगू शकतो. मुद्दा क्रमांक ७ तसेच दिनांक २९.०४.२०२० तसेच दिनांक ०५.०५.२०२० मधील (वाचले) मा.महापौरजी, माझी मागणी ही आहे जे मी फायडींग काढले की या दोन्ही आदेशामध्ये मोठया प्रमाणात तफावत आहे. आभाताई पांडे यांनी आरोप लावलेले आहेत ते या २९.०४.२०२० च्या मुद्दयामध्ये सापडून जातील. ०५.०५.२०२० च्या पुढे जाणार तर ते सापडणार नाहीत मा.महापौरजी. त्याची सुध्दा त्याच स्तरावर चौकशी होणे आवश्यक आहे मा.महापौरजी, इतका दराचा अंतर कसा काय झाला ? नंतरच्या काळामध्ये फार तर दोन-तीन एजन्सीच्या माध्यमातून खरेदी झाली. या नंतरच्या काळामध्ये जी परिस्थिती झाली ती ज्या पध्दतीने झाली आपल्याला या ठिकाणी मुद्दा क्रमांक ७ मध्ये तेवढी तफावत निश्चितपणे दिसून येईल. मुद्दा क्रमांक १२ येथे थोडा डिस्पुट दिसतो मा.महापौरजी, नवीन आलेल्या आयुक्तांच्या काळामध्ये मुद्दा क्रमांक १२ मध्ये शेवटच्या दोन ओळी जुलै २०२० ८ ते १५ हजार जणांचा डाटा दररोज अपलोड करण्यात आला(वाचले) प्रशासन खुप स्मार्ट असते. ८ ते १५ हजार लोकांचा डाटा हा दुस-या लाटेच्या वेळेला आलेला आहे. टेस्टींग ८ हजारच्या वर गेल्या त्या मला वाटते एक-दोन दिवस गेल्या असतील. परंतु कुठे तरी जुन्या अधिका-याच्या बद्दल सॉफ्ट कॉर्नर नवीन आयुक्तांमध्ये दिसतो आहे.

त्यामुळे त्यांनी अहवालामध्ये हा मुद्दा टाकून ठेवला आहे. कारण हा सर्व चा सर्व खर्च हा नवीन आयुक्तांच्या काळामध्ये झालेला आहे. जुन्या आयुक्तांच्या काळामध्ये झालेला नाही. पुर्ण अहवाल वाचला तर त्यांनी आकडेवारी दिलेली आहे. जो खर्च दिलेला आहे ११ करोडचा तो कर्मचारी यांच्या पगारावर दिलेला खर्च आहे. बाकीचा खर्च आहे, आरोग्य विभागावर १ करोडचा खर्च आहे. धनकचरावर २४ लाख खर्च झालेला आहे. थर्मामीटर व थर्मल बल्ब २७ लाखाचा खर्च आहे. किती घेतल्या, एका थर्मामीटरची किंमत किती ? थर्मामीटल बल्ब खरच वापरण्यात आले आहे काय? याची सुध्दा चौकशीची आवश्यकता आहे. हया नंतर च्या काळामध्ये थर्मामीटर व थर्मल बल्ब ची काही खरेदी केली होती काय ? कारण आधीच्या काळामध्ये जे खरेदी केली होती त्याचा वापर झाला असेल असे मला वाटत नाही.बॉयोमीटर, बॉयोमीटरवेब , कारण १ करोड १० लाख रुपये खर्च आपल्याला नागपूर शहराकरिता आलेला आहे. मा.महापौरजी, एवढया मोठया खर्चाची या ठिकाणी आवश्यकता होती काय ? कारण पीपीटी किट ज्या वर आरोप झाले त्याची खर्च ५८ लक्ष ९६ हजार आहे. तर मग ती मनगढंत कहानी आहे की अक्युचल खरेदी आहे. ज्याप्रमाणे मा.आभाताई पांडे ने सांगितले की पीपीटी किटमध्ये मोठा घोटाळा झाला, ती जी किंमत आहे खरेदी केल ४४०० मध्ये ती आकडेवारी आणि आरोपामध्ये तफावत आहे मा.महापौरजी. हे थोडे तपासून पाहावे लागेल. एकंदरीत हा जो अहवाल आला हा सुस्पष्ट अहवाल आहे. या अहवालावर दोन पार्ट करुन जी कार्यवाही करावयाची आहे. केलेल्या आरोपावर तथ्याच्या आधारावर तपासावे लागेल. सभागृहाचा सुर आहे ती आपण त्याची तपासणी करावी. ज्यावेळेला अशा प्रकारचे आरोप होतात त्यावेळेला या सर्व गोष्टीची तपासणी किंवा चौकशी केली नाही तर इतिहासात याची नोंद होईल. वारंवारं या गोष्टीवर चर्चा होईल की आरोप केल्यानंतरही सत्तापक्षाने याची चौकशी केली नाही. माझी आपल्याला विनंती आहे. हे होत असतांना आपण चौकशी निश्चितपणे करायला पाहिजे. त्यामध्ये दुध का दुध आणि पानी का पानी होवून जाईल. तत्कालीन आयुक्तांच्या काळामध्ये जे दिसत आहे ते सुध्दा जनतेसमोर आले पाहिजे. त्या कार्यकाळामध्ये आपल्याला सुध्दा चोर ठरविण्यात आले होते. त्यांच्या कार्यकाळामध्ये वृत्तपत्रामध्ये सन्माननीय आयुक्त १००८ प्रकंत पंडीत होते त्यांच्या कार्यकाळामध्ये वृत्तपत्रातून नगरसेवक चोर आहेत, आपल्याला चोर ठरविण्यात आले होते मा.महापौरजी. मग यामध्ये खरा चोर कोण आहे हे निश्चितपणे या शहरातील जनतेला कळले पाहिजे. करोनाच्या काळामध्ये राजकारणाची भुमिका ठेवली, एका वर्तमानपत्रामध्ये मी वाचले तेव्हा आपले बजेट यायचे होते मा.महापौरजी, आपल्या विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मागणी केली ५०० कोटी रुपयेची. शासनाने २५ करोड दिले, मग एवढीच इच्छा आहे तर राज्य सरकारकडून ५०० कोटी रुपये आणावयाचे होते.

श्रीमती आभा पांडे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, सत्तापक्ष नेत्यांनी म्हटले आहे की राज्य शासनाने २५ करोड रुपये दिले परंतु २५ करोड रुपये ही खर्च केले जात नाही.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, आम्हांला गॅरंटी आहे की हे राज्य सरकार फक्त मुंबई आणि पुण्यापर्यंत मर्यादित आहे. आम्हांला काही अपेक्षा नाही त्यामुळे आम्हांला चिंता ही नाही देतील किंवा नाही देतील. त्यांचे सरकार फक्त मुंबई आणि पुण्यापुरते सुरु आहे. आभाताई पांडे आपण आरोप करता

सत्तापक्षांनी खर्च केला नाही. येथे सत्तापक्ष खर्च करतील की प्रशासन खर्च करतील. प्रशासनाने कां खर्च केला नाही.

महापौर:- सभी मा.सदस्यों से विनंती है की सभागृह शुरु है, और सभागृह मे महापौरजी की अनुमती की बगैर हम बोल नही सकते है। हम आपस की चर्चा ना करे। इस बात का ध्यान रखे की सभागृह मे बैठे है कोई उद्यान नही बैठे है। नंदाताईने पाईंट ऑफ आर्डर लिया था, नंदाताई आप बोले।

श्रीमती नंदा जिचकार:-पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, आताच ताईने म्हटले की प्रशासन आपले आहे. भारतीय जनता पार्टीचे महापौर आहेत हे मान्य आहे आणि मा.महापौरांच्या नेतृत्वामध्ये कोरोनामधून नागपूर शहर कसे सावरले हे सुध्दा जनतेने पाहिलेले आहे. केंद्र सरकारने लसीकरणासाठी सोय करुन दिली. माझे एवढेच म्हणणे आहे की त्या राज्य सरकारच्या सत्तेतील पक्षाच्या पदाधिकारी आहेत. त्यांनी १, २,३,४, मुद्दे सांगावे की राज्य सरकारने नागपूर महानगरपालिकेसाठी हे हे केलेले आहे ते या जनतेकरिता सांगावे. मला माहीत आहे की बाळासाहेब ठाकरे नाव दिल्याशिवाय नागपूर महानगरपालिकेकरिता काय केले आहे. हे मला कळत नाही. आधी पक्षाने करुन दाखवावे मग सांगावे.

श्रीमती आभा पांडे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, आमच्या सरकारने केलेले आहे ती यादी खुप मोठी आहे.

श्रीमती नंदा जिचकार:- राज्य सरकारने काय केले ते सांगावे.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. पाईंट ऑफ इन्फोंमेशन घेवून मा. आभाताई पांडे यांनी सांगितले की निधीचे नियोजन झालेले नाही. ९ कोटी ९८ लक्ष रुपयाचा निधी आर्थिक २०२०-२१ करिता जो प्राप्त झाला होता तो पुर्ण खर्च झालेला आहे. २०२१-२२ करिता ५५ कोटी ८८ लाख ७९ हजार ११३ इतका निधी खर्च झालेला आहे. आता आर्थिक वर्ष सुरु होवून दोन महिने झाले आहे ते १०० टक्के प्रशासन आपल्या माध्यमातून जे काम करीत आहे त्याचे नियोजन करुन तशी प्रक्रिया करतील. मी या विषयावर सांगू इच्छितो की, एकंदरीत या अहवालाचे वाचन करीत असतांना असे लक्षात आले की जे आरोप मा.आभाताई पांडे यांनी लावलेले आहेत ते साधारणत: २९.०४.२०२० या कार्यकाळात जिल्हा आपातकालीन व्यवस्थापन समितीकडे जे प्रस्ताव पाठविण्यात आले होते ते या मध्ये आभाताई पांडे यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत ते सापडतील. तर या प्रस्तावामध्ये काय काय पाठविलेले आहे ते संदर्भात निश्चित चौकशी झाली पाहिजे अशी माझी विनंती आहे. आभाताई पांडे यांनी सांगितले की एजी ऑफीसच्या कर्मचा-याकडून ही चौकशी झाली पाहिजे परंतु आपल्या विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे यांनी सांगितले की सभागृहाची समिती झाली पाहिजे.

श्रीमती आभा पांडे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, की काहीच म्हटले नाही.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, मी आभाताईच्या बद्दलचे शब्द मागे घेतो कदाचित माझ्या ऐकन्यात आले नसेल. तानाजी वनवे यांनी निश्चितपणे म्हटलेले आहे. परंतु चौकशी समिती स्थापन करतांना मा.महापौरजी यांना अधिकार दिले पाहिजे. किमान २९.०४.२०२० या काळातील चौकशी या ठिकाणी व्हावी. सभागृहाची इच्छा असेल तर आणि मा.महापौरजी ज्या प्रमाणे निर्णय घेतील असे निवेदन

करतो.

महापौर:-स्थगण प्रस्तावावर सर्व पक्षाच्या नगरसेवकांनी आपला निवेदन  सभागृहाच्या पटलावर नोंदविला. जे काही  नगरसेवकांच्या माध्यमातून सभागृहाच्या पटलावर नोंदविण्यात आलेले आहे त्याबद्दल स्थगण प्रस्तावावर निगम आयुक्त आपले निवेदन करतील.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. या संदर्भात पहिलेॲडीशनल कमिश्नर राम जोशी संबंधित विषयावर सखोल असे ते बोलतील त्यानंतर मी त्यात काही मुद्दे ॲड करेल.

श्री.राम जोशी(अपर आयुक्त):- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. या सभागृहाच्या जेष्ठ सदस्या श्रीमती आभाताई पांडे यांनी जो स्थगण प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला.  या स्थगण प्रस्तावाचा मुळ जो त्यांनी १० जून २०२१ रोजी मा. आयुक्त महोदयांना दिलेले एक निवेदन आहे. ज्यामध्ये मनपा औषधी विभाग याने कोव्हीड काळात कोटयावधी रुपयाच्या गैरव्यवहाराबाबत. या अनुषंगाने त्यांनी जे मुद्दे या तक्रारी सोबत मांडलेले होते त्या मुद्दयावरुन त्यांनी पठन केले आणि या सभागृहापुढे पुन्हा पुन्हा मांडले. याच प्रशासनाने या मुद्दयावरुन त्यांना जे १७.०६.२०२१ रोजीच्या पत्राने उत्तर दिले आहे जे वैद्यकीय आरोग्य अधिकारी म.न.पा. यांच्या स्वाक्षरीने त्यांना पाठविण्यात आलेले आहे. त्या बाबी पैकी काही बाबी सभागृहापुढे पुर्णत: आल्या नसल्याने काही जणांना गैरसमज झाल्याचे येथे स्पष्ट दिसत आहे.बोलता बोलता ताई ने असे म्हटले की अति.आयुक्त आरोग्य विभाग पाहत नव्हते तसे आदेश त्यांनी जीएडी विभागाकडून प्राप्त करुन घेतले आहे. ९ जून २०२१ रोजी पुन्हा अति.आयुक्तांकडे आरोग्य विभाग दिल्याचे आदेश त्यांनी जीएडी कडून प्राप्त करुन घेतले. मधल्या काळात जे आदेश आहेत कदाचित त्यांच्याकडे पोहचलेले नसतील त्यामुळे याबाबत त्यांचा गैरसमज झाल्याचे दिसून येते. शासनाने सामान्य प्रशासन विभाग महानगरपालिकेला २७.०३.२०२० रोजीच्या आदेशाने  अति.आयुक्त २७.०३.२०२० ला या महानगरपालिकेमध्ये मी एकमेव अति.आयुक्त उपलब्ध होतो. आणि ज्या वेळेला तत्कालीन आयुक्तांनी जे आदेश केलेले आहे ते आदेश मा.महापौरजी मला वाचून दाखवायचे आहेत.  ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायद्या १८९७  दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३, ४ तरतूदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेल्या आहेत. ज्या अर्थी महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणू अंतर्गत उदभवणा-या  रोगाचा प्रतिबंध आणि नियंत्रण यासाठी महाराष्ट्र कोव्हीड उपाययोजना २०२० यातील नियम ३ नुसार शहरी भागात आयुक्त महानगरपालिका यांना सक्षम प्राधिकारीणी म्हणून घोषित केले. त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड -१९ वर नियंत्रण आणण्यासाठी त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना आवश्यक आहेत त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे जाहीर केले आहे. ज्या अर्थी या कार्यालयाचे आदेश क्रमांक २५ .३.२०२० अन्वये नागपूर शहरी भागात या संदर्भाने नियंत्रण व उपाययोजना करण्याच्या संदर्भाने आदेश पारित करण्यात आलेले आहेत. त्याअर्थी कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखणे व या संदर्भात आवश्यक उपाययोजना करुन त्याची अंमलबजावणी करण्यास्तव नागपूर महानगरपालिका अंतर्गत खालील नमुद अधिका-यांची याद्वारे विविध कामास्तव नियुक्ती करण्यात येत आहे.  त्यामध्ये पहिलेच नाव आहे राम

जोशी अति.आयुक्त माझा संपर्क क्रमांक दिलेला आहे आणि सोपविलेली जबाबदारी आहे त्यामध्ये म्हटलेले आहे. शासनाने विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्याशी समन्वय ठेवावा, महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या कामाचा आढावा आणि सनियंत्रण ठेवणे, सर्व झोन, प्रभागात सुरु असलेले सर्वेक्षण संदर्भात आवश्यक नियंत्रण करणे. महानगरपालिकेच्या विविध कामाचा आढावा व सनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी अति.आयुक्त म्हणून मला देण्यात आल्याचे आपल्या निर्दशनास आणून द्यावयाचे आहे मा.महापौरजी. या सोबत तत्कालीन आयुक्तांनी ७ जून २०२० चे आदेशाने नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागांकरिता आवश्यक साहित्य खरेदी करिता एक समिती गठीत करण्यात आली आहे. तत्कालीन मा.आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या स्वाक्षरीने हे आदेश निघालेले आहेत. ते आदेश मी वाचून दाखवितो. ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाचे उद्योग, उर्जा, कामगार विभागाचे शासन निर्णय दिनांक ३ डिसेंबर २०१६ मध्ये शासकीय विभागाने करावयाच्या खरेदीच्या कार्यपध्दतीचे सुधारित नियमपुस्तीका नमुद करण्यात आली असून मुद्दा क्र. २.९.४.खरेदी प्रक्रिया राबविण्याबाबत समिती स्थापन करण्यात आली असूनत्याअर्थी नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभाग खरेदी अंतर्गत प्रक्रिया राबविण्यासाठी खालीलप्रमाणे संगती करण्यात येत आहे. आणि त्या संगतीमध्ये पहिले नाव आहे. अध्यक्ष, अपर आयुक्त शहर, उपायुक्त  सामान्य प्रशासन विभाग, सदस्य, अधिक्षक अभियंता, बांधकाम विभाग सदस्य, प्रमुख लेखा व वित्त अधिकारी सदस्य, संबंधित विभाग प्रमुख ज्या ज्या वेळेला राहतील ते सदस्य सचिव राहतील. दोन्ही आदेशाच्या अनुषंगाने जे सन्माननीय जेष्ठ सदस्या श्रीमती आभा पांडे यांचा जो विषय होता ही अति.आयुक्त यांच्याकडे हा विषय नसतांना त्यांनी स्वाक्षरी करुन आयुक्तांकडे फाईली पाठविल्या, स्वाक्षरी करुन कशा फाईली निर्गमित करण्यात आल्या या दोन्ही बाबतचा खुलासा म्हणून हे वाचून दाखविणे आवश्यक होते. म्हणून मा.महापौरजी यांना  हे दोन्ही आदेश वाचून दाखविले. या शिवाय ज्या दिवशी पॅन्डामिक स्थिती निर्माण झाली झलके साहेबांना बोलता बोलता सांगितले की ११ मार्च ला  जेव्हा पहिला पेशंट सापडला तेव्हा अति.आयुक्त म्हणून मी येथे काम करीत आहे.  नंदाताईने असे सांगितले की फार कमी अधिका-यांना अशा परिस्थितीत लोकांचे काम करण्याची संधी मिळते. मी नशीबवान आहे की ज्या शहरात मी राहतो त्या शहराच्या नागरिकांची सेवा करण्याची संधी या खुर्चीत बसुन या महापालिकेने मला दिली. या सगळया कार्याच्या बाबतीत मागील ११ मार्च मध्ये जेव्हा पहिला पेशंट या नागपूर शहरात आला आणि त्या पासून आजपर्यंत या कोव्हीडमध्ये सतत मी काम करीत आहे. तत्कालीन आयुक्तांच्या निर्देशाप्रमाणे आणि मार्गदर्शनाप्रमाणे ते असेपर्यंत आणि नविन आयुक्त येथे रुजू झाल्यापासून आयुक्तांच्या मार्गदर्शनाप्रमाणे काम करण्यात आलेले आहे. यामध्ये जे मुद्दे १० जून २०२१ च्या अनुषंगाने ताईने मांडले होते. त्याचे उत्तर प्रशासनाकडून आरोग्य अधिका-यामार्फत त्यांना सादर करण्यात आले आहे ते मा.आयुक्त यांना दाखवून त्यांची मंजूरी घेवून सादर करण्यात आले आहे. त्यामध्ये त्यांचा जो महत्वाचे दोन-तीन विषय त्यांनी मांडले आहे त्याच्या वरती पुन्हा मी खुलासा सादर करु इच्छितो. त्यांनी म्हटलेले आहे कोव्हीडच्या काळात राज्य सरकारच्या एसबीआयएफ अनुदानातून कुत्र्याचा श्वानदंश वॅक्सीन, एआरव्ही आणिॲन्टीवॅक्सीन लसी घेतल्या आहे. यामध्ये मी स्व:त ने विभागाच्या फाईली

तपासण्याकरिता सांगितलेले आहे. कोणत्याही प्रकारची श्वानदंशाबद्दलची एआरव्ही ही एसबीआयएफच्या निधीतून घेण्यात आल्या नाहीत. याचे स्पष्ट उत्तर सुध्दा त्यांना प्रशासनाकडून सादर करण्यात आलेले आहे त्याच्यामध्ये उल्लेख करण्यात आला या आरोग्य विभागाद्वारे ११.०९.२०२० रोजी ११५० लसी घेण्यात आलेल्या आहे. या महानगरपालिकेच्या कुठल्या पद क्रमांकामधून घेण्यात आल्या आहेत याची माहिती सुध्दा सादर करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त ज्या बाबीबाबत त्यांनी माहिती मागितली होती त्याच्यात सुध्दा असे कळविण्यात आले आहे जर याशिवाय कोणतीही माहिती जी विभागाद्वारे प्राप्त झाली नसेल तर ती सुध्दा विभागाद्वारे नाही तर दुस-या विभागाची असेल तर आम्ही उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. या उत्तराच्या अनुषंगाने असे सादर करण्यात आलेले आहे. कोव्हीडचा विषय हा आरोग्य विभागाचा महत्वाचा विषय असला तरी एवढया मोठया शहरात आरोग्य विभाग एकटाच काम करीत नाही तर परिवहन विभाग असो, स्वच्छता विभाग असो, प्रोजेक्ट विभाग असो, अशा वेगवेगळया विभागाने वेगवेगळी कामे या ठिकाणी केलेली आहेत. कदाचित आपल्याला माहिती प्राप्त करण्यास त्रास झाला असेल. परंतु प्रशासनाचे पारदर्शिक धोरण आहे आपल्याला कोणत्याही बाबतीत माहिती पाहिजे असल्यास ती माहिती आम्ही निश्‍चितपणे उपलब्ध करुन देण्यासाठी मदत करु.त्यात्या विभागाला त्याप्रमाणे निर्देश देवू आणि त्यात आम्ही स्व:त इन्व्हॉल होवू आणि पुढील माहिती प्राप्त करुन देवू. या प्रश्नावलीला उत्तर सादर करण्यात आले आहे त्यांनी असे म्हटलेले आहे की एकच बीलाचे भुगतान केंद्र आणि राज्य सरकारच्या अनुदानातून करण्यात आले आहे. त्याबाबत तपासणी करण्यात आली आहे त्यांना आरोग्य विभागाच्या प्रमुखाकडून जी माहिती सादर करण्यात आली त्यात स्पष्ट कळविण्यात आले आहे की ३१.०७ .२० चा कार्यादेश आहे, वर्कआर्डर आहे त्याप्रमाणे देयक २ लाख ९१ हजार२०० हा अमाऊंट आहे. १०.०८.२०२० चा एक कार्यादेश आहे त्याप्रमाणे पुन्हा २ लाख ९१ हजार २०० चा अमाऊट आहे तसेच १७.०८.२०२० चा जो तिसरा कार्यादेश आहे तो सुध्दा २ लाख ९१ हजार २०० चा आहे या तिन्ही कार्यादेशची रक्कम सारखी असल्यामुळे ताईंना गैरसमज झाला असेल की हे तिन्ही बीले रिपीट देण्यात आले आहे. त्याचा पुढे खुलासा करण्यात आलेला आहे. यामध्ये एक ते तीन नंबरचे बीलाचे भुगतान एसबीआयएफ अनुदानातून, दुस-यानंबरच्या बीलाचे भुगतान एनयुएचएमच्या फंडातून करण्यात आले आहे. एकाच बाबीचे वेगवेगळया फंडातून भुगतान झालेले नाही. त्यात कोणतीही वित्तीय अनियमतता झालेली नाही असे कळविण्यात आले आहे. त्यांनी पुढे असे म्हटले की एकाच बीलाचे भुगतान दोन शासकीय निधी केंद्र आणि राज्य सरकारच्या आणि एनयुएचएमच्या अनुदानामधून सुध्दा खर्च करण्यात आला आहे. काही एसबीआयएफ मधून सुध्दा करण्यात आली आहे हे सुध्दा खरे नाही ही बाब आम्ही स्पष्ट केलेली आहे. त्याच्यामध्ये त्यांनी पीपीटी किट बाबत मुद्दा सुध्दा मांडला आहे त्याबाबत मी काही उल्लेख् करु इच्छितो, आपल्याकडे एक या अनुषंगाने डिझास्टर मॅनेजमॅट ॲक्टच्या खर्चासाठी जिल्हा समिती नेमण्यात आली आहे ज्यामध्ये जिल्हाधिकारी, सिव्हील सर्जन, डीएचओ हे सगळे मेंबर्स सदस्य आहेत. जिल्हाधिकारी यांच्या संमत्तीने या समितीद्वारे वेळोवेळी घेतलेल्या बैठकीमध्ये ज्या ज्या बाबी कन्फर्म झाल्या त्या रेटच्या अनुषंगाने आपण पुढे गेलो आहे. महानगरपालिकेने जी काही टेंडर प्रक्रिया

केली आहे त्या टेंडरमध्ये जे अॅटम मान्य केले त्याच्या व्यतिरिक्त जे काही घ्यावयाचे आहे ते सुध्दा तेव्हा तत्कालीन टेंडरपेक्षा कमी दराने खर्च केला आहे. याच्यामध्ये ६ (ब) जो प्रश्न दिला आहे त्याचे उत्तर आपल्याला कळविले आहे. पीपीटी किट आहे या जिल्हास्तरीय समितीद्वारे रिसर्च राष्ट्रीय इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, अमरावती या कंपनीच्या डिस्ट्रीब्युटने रिसर्च किट ड्रग्स् नागपूर यांचे द्वारे मंजूर करार ३७५ अधिक जीएसटी या मंजूर दरात वाटाघाटी करुन १० रुपये कमी करुन ३६५ अधिक जीएसटी ५ टक्के या दरात १५,५७,४८ रुपये मध्ये पीपीटी किट खरेदी करण्यात आले आहे. हा ५७ हजार ४८हजार हा निधी एनयुएचएम मध्ये खर्च करण्यात आला आहे त्यामध्ये साधारणत: ३८३ रुपयात ही पीपीटी किट आपल्याला पडलेली आहे. यामध्ये वित्तीय गोंधळ झालेला आहे असे प्रामुख्याने तक्रार होती त्यामध्ये सुध्दा रॅपीड एन्टीजेन्ट टेस्टच्या ज्या किट आहेत त्याचे बील एनयुएचएम मध्ये खर्च करण्यात आला आहे. हे दोन्ही बीले कशी वेगवेगळी आहेत आणि कोणत्या तारखेला खतवली गेली आहेत याबद्दल आपल्याला सविस्तर माहिती दिलेली आहे. बील क्रमांक ३९५२ दिनांक १४.०८.२०२० प्रमाणे अप्रुव्ह रेट ५०४ प्रमाणे प्रती किटचे ४५०० प्रती किटच्या खरेदीवर अमाऊन्ट २२ लाख ६८ हजार एनयुएचएम मधून नियमानुसार पारित करण्यात आले आहे. बील क्रमांक ५४७२, दिनांक ८.०८.२०२० प्रमाणे अप्रुव्ह रेट ५०४ प्रमाणे घेण्यात आले आहे. या दोन्ही बाबींचे बील आहेत ते एनयुएचएम मध्ये पेमेंट करतांना मा.आयुक्तांची व्यवस्थित परवानगी घेवून नियमानुसार करण्यात आले आहे. यामध्ये आपल्याला असे वाटले असेल की अति.आयुक्त यांच्या स्वाक्षरीने हे भुगतान कां करण्यात आले आहे. तर एनयुएचएमचा जो बॅक अकाऊन्ट आहे त्या एनयुएचएमचे जे डायरेक्शन आहेत त्याप्रमाणे आयुक्त किंवा अति.आयुक्त एमएचओ मेडीकल ऑफीसर हेल्थ आणि एनयुएचएमचे अकाऊन्ट ऑफीसर आहेत या तिघांच्या स्वाक्षरीने हे अकाऊन्ट ऑपरेट होत असते याच्यामध्ये अति.आयुक्त म्हणून माझी स्वाक्षरी आहे. त्यामध्ये हे बील देण्यात आले आहे. आपण असेही म्हटले की अर्धवट माहिती मध्येच एवढा भ्रष्टाचार दिसत आहे तर संपुर्ण माहिती तपासली तर कायतफावत दिसेल.आपण ही माहिती जेव्हा विभागाला मागितली तेव्हा पहिल्या टप्प्याचा ९ कोटी ७८ लाखाचा हा जो निधी आहे तो एसबीआयएफ मध्ये प्राप्त झाला होता त्यापैकी ५ कोटी २८ लाख प्राप्त झाले होते आणि ४ कोटी ५० लक्षाचा निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून येणार आहे असे कळविण्यात आले होते. जो विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना देण्यात आला होता तेव्हा आपल्याला कदाचित ५ कोटी २८ लाखाचीच माहिती देण्यात आली असेल. याद्वारे मी असे कळवितो की या पुढची माहितीआपणांस आवश्यक असेल तर ती सुध्दा आपल्याला कळविण्यात येईल. आमच्या प्रशासनाची पारदर्शकता पुर्णपणे राहील अशी ग्वाही देतो. विभागातर्फे अपुरी माहिती दिल्याबाबत आणि, भ्रष्टाचाराला वाव दिल्याबाबत आपण असे म्हटले आहे की भ्रष्टाचारा झालेला आहे. परंतु भ्रष्टाचार झाल्याचे येथे सकृतदर्शी दिसत नाही. आपल्याला ५ कोटी २८ लाखाची माहिती दिलेली आहे तशीच आताच मा.सत्तापक्ष नेता यांच्या विनंती वरुन सभागृहाला इतिवृत्त पाठविले आहे जी माहिती पाठविलेली आहे त्यामध्ये सगळया बाबींची माहिती साधारणत: विभागानिहाय देण्यात आलेली आहे. त्यामध्ये आपल्याला काही सविस्तर बाबी लागतील त्याची सुध्दा

माहिती त्या त्या विभागामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल. आपण असे म्हटले की अधिकार नसतांना अधिका-याने आपल्या अधिकाराचा गैरवापर केलेला आहे. प्रशासनाच्या डोळयात धुळ झोकुन गोरगरीब जनतेच्या हक्काच्या पैश्याची उधळपट्टी केली, अशी कोणतीही बाब येथे निदर्शनास आलेली नाही. या बाबतची माहिती आपल्याला कळविण्यात आलेली आहे. पीपीटी किट खरेदीच्या बाबत आपण असेही म्हटले आहे की प्रशासनाने किंवा शासनाने असे आदेश दिले की ५०० रुपयाच्या वरती दराने हॉस्पीटलने घेवू नये. महानगरपालिकेने मात्र त्याच्या पेक्षा जास्त दराने पीपीटी किट खरेदी केली. मी आपल्याला सांगू इच्छितो, पीपीटी किट च्या बाबतीत शासनाचे हॉस्पीटलच्या बाबतीत जे  निर्देश होते ते ३१ ऑगस्ट चे आहेत. त्याच्या पूर्वी पीपीटी किटची काय परिस्थिती होती हे आपण सगळे जाणतो.  ११ मार्च ला जेव्हा पहिला पॉझिटीव्ह पेशंट आल्यानंतर एप्रिल ला आपल्याला मध्येही कुठेही पीपीटी किट उपलब्ध होत नव्हती. यापूर्वी पीपीटी किटसाठी आदरणीय गडकरी साहेबांनी पुढाकार घेवून काही लोकांनामहानगरपालिकेला पीपीटी किट डोनेट करण्यास विनंती केली होती. आज मला येथे सांगायला छान वाटते की त्यांच्या विनंती वरुन , त्यांच्या आग्रहावरुन येथे काही पेट्रोल पंप असोसिएशन इतर सगळे असोसिएशन यांच्या माध्यमातून महानगरपालिकेला पीपीटी किट चा पहिला सेट डोनेशनच्या माध्यमातून प्राप्त झाला. आपण जी खरेदी केली ती सुध्दा आम्ही जिल्हा समिती ने अप्रुव्हल केलेले जे रेट आहे त्याप्रमाणे खरेदी केलेली आहे. तो ३०.४.२०२० म्हणजे ३० एप्रिलला ८४० रुपयाला खरेदी केलेली आहे. हळूहळू यामध्ये बदल होत गेला आणि पीपीटी किटची मॅन्युफॅक्चरींग वाढली. काही लोकांनी ज्यांनी पूर्वी पीपीटी  किट तयार करणे बंद केले होते ज्यांचे कारखाने बंद झाले होते त्या कारखानदारांनी पर पीपीटी किट तयार करण्यास सुरुवात केली. जसे जसे प्रोडक्शन वाढले तसतसे पीपीटी किट बाजारात उपलब्ध होवू लागल्या त्यांच्या किंमती कमी होत गेल्या. यापूर्वी महानगरपालिकेने  ३०.०४.२०२० ला ८४० दराने जे पीपीटी किट घेतले  ते अतिशय अल्प संख्येने घेतले १ लाख ६८ हजारचे पीपीटी किट होते. २५० जे पीपीटी किट घेतले ते किती दवाखान्यात किती दिवस चालले याची आपल्याला कल्पना असेल. त्यानंतर १५ जून रोजी पीपीटी किटची उपलब्धता वाढली आणि दर घसरुन आपण ६०३ रुपयाने पीपीटी किट विकत घेतल्या आहेत. पुढे आणखी किंमती कमी होवून ९ सप्टेंबरला जेव्हा तिस-यांदा पीपीटी किट खरेदी केल्या त्या ३८५ रुपये या दराने पीपीटी किट खरेदी केल्या आहेत. आता ४ मे ला जी खरेदी केली त्यामध्ये आपल्याला १७७ दराने या पीपीटी किट मार्केटमध्ये मिळाल्या. मार्केटमध्ये जसजसे साहित्याची उपलब्धता वाढते त्या प्रमाणे त्यांच्या किंमती कमी जास्त होत असतात. हया अशा गोष्टी आहेत की  त्यावेळी एक लिमिटेड साहित्य पुरवठा होता. त्या वेळी असे बघतो की रेमीडेसीवर इन्जेक्शन सुध्दा त्याची एका लिमिटेड प्रमाणात त्याचे उत्पन्न होत आणि त्याची किंमत त्याची अर्वॅलिबीटी बाजारात नव्हती. उपलब्धता होती त्यामुळे आपल्याला या बाबी स्वस्त नसल्यामुळे घेण्यात आल्या आहेत. सगळया बाबींमध्ये अनियमितता झालेली नाही याची सुध्दा खात्री करण्यात आली आहे. आपण मुद्दा मांडला आहे, इन्फ्रा थर्मामिटर ज्याला आपण थर्मामिटर गन म्हणतो, जे पूर्वी सर्वसाधारण नागरिकांनी कधीही पाहिलेले नव्हते. ती घेण्याची वेळ आपल्यावर आली. थर्मामीटरने बॉडीवरील टेंम्परेचर आपण घेतो ते आपल्याला स्वस्त

दरात पडले असते परंतु टेम्पेचर घेतांना बॉडीचा स्पर्श झाला असता. स्पर्श न करता टेम्पेचर मोजण्यासाठी थर्मामीटर गन शिवाय आपल्याकडे कोणताही पर्याय नव्हता. महाराष्ट्र भरात या इन्फ्रा थर्मामिटर गनची खरेदी करण्यास सुरुवात झाली. आपल्याला अल्पशा उपलब्ध करुन घ्यावयाच्या होत्या त्या आपण २५ नग ११हजार ९९० दराने घेतलेल्या आहे. हा दर जरी आपल्याला त्यावेळेस मोठा वाटत असला तरी त्या इन्फ्रा थर्मामीटर त्यावेळेस उपलब्ध नव्हत्या. गर्व्हमेंट मेडीकल यांनी सुध्दा या इन्फ्रा थर्मामीटर याच दराने विकत घेतलेल्या आहेत त्यांची संख्या जास्त आहे. आपल्याला कमी पाहिजे होत्या, आपल्या प्रिमाईसेस मध्ये संपर्कात येणा-या नागरिकांची, कॉल सेंटरवरती येणा-या नागरिकांची टेंम्पेचर मोजून घ्यावयाचे होते.परत काही दिवसाने या इन्फ्रा थर्मामीटर गनची अवॅलीबीटी वाढत गेली आणि इन्फ्रा थर्मल गन आपल्याला ४५०० रुपयेचे झाले हे आपण आपल्या तक्रारीमध्ये नमुद केलेले आहे. जुलै २०२० मध्ये ४०० नगर ४५०० रुपये प्रती नगाप्रमाणे खरेदी करण्यात आले आहे. पुढे त्याची अॅवॅलीबीटी आणखी वाढले काही कंपन्या मार्केटमध्ये अशा आहेत त्यांचे प्रोजेक्टशन बंद झाले होते त्यांनी सुध्दा सुरु केले. १६८० भावाने या इन्फ्रा थर्मल गनची खरेदी केलेली आहे. आता तर त्याच्याही पेक्षा कमी दराने उपलब्ध झाल्या आहे. या दरम्यान आपण पल्स ऑक्सीमीटरचा अतिशय महत्वाचा असा मुद्दा आपण मांडलेला आहे. आपण सुरुवातीला कदाचित पहिले शहर असेल जेव्हा पॉझिटीव्ह आल्याबरोबर आपणप्रत्येक घराघरात जावून माहिती घेण्यास सुरु केले. २५ लक्ष नागरिकांचे सर्व्हे करण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला आणि सर्व पदाधिकारी यांनी सपोर्ट केला. यानुसार घरोघरी जावून घेतलेल्या स्टॉपच्या मदतीने घराघरातून माहिती प्राप्त करुन घेतली. त्या माहिती चा उपयोग काही कारणांसाठी करुन घेतला. त्या वेळेला आपल्याला पल्स ऑक्सीमीटरची जास्त आवश्यकता भासली. १९ मे २०२० रोजी ला१६५ पल्स ऑक्सीमीटर खरेदी केले त्याचा रेट १७९२ होता आताच्या मार्केट रेट नुसार तो मोठा वाटत असला तरी त्यावेळेस १७९२ पेक्षा खालच्या दराने उपलब्धताच होत नव्हती. त्यानंतर लगेच महिनाभराने १६ जून रोजी ४०० पल्स ऑक्सीमीटर विकत घेतले. १४४५ या दराने विकत घेतले त्या नंतर आपण काही वेगवेगळे प्रयोग केले. कोरोना रुग्णांसाठी काही विशिष्ट प्रयोग इतरांच्या मानाने काही वेगळे करण्याचा प्रयत्न होता.यासाठी काही पोलीस स्टेशनच्या कर्मचा-यांची मदत घेवून पोलीस स्टेशन निहाय टीम तयार करुन आमच्या विभागीय आयुक्तांनी यामध्ये पुढाकार घेतला, आणि मा.महापौरजी यांनी सुध्दा निर्देश देण्यात आले होते. घराघरात जावून प्लस ऑक्सीमीटर लावून लोकांचे ऑक्सीजन लेव्हल तपासण्याचे काम केलेले आहे. या ४०० पल्सऑक्सीमीटरचा साठा घेतल्यानंतर हा घेतला आहे १६ जून २०२० रोजी त्यानंतर ३०ऑगस्ट, ४.०९, ५.०९ या चार पाच दिवसात सिव्हील सर्जनकडून येणारा जो पल्सऑक्सीमिटर सप्लॉय आहे तो फ्री ऑफ कॉस्ट तो आपल्याला विकत घ्यावा लागला नाही. अशा आपल्याला ३५०० नग पल्स ऑक्सीमीटर प्राप्त झाले. माझे कुटूंब माझी जबाबदारी हा शासनाचा मोठा कार्यक्रम राबविण्यात आला या सगळया साठी आपल्याला या पल्सऑक्सीमीटरची उपयोगिता आली. त्यानंतर मात्र पल्स ऑक्सीमीटरची पुन्हा खरेदी करण्याची गरज भासली नाही. एक मुद्दा होता, ९९८ रेमीडेसीवीर इन्जेक्शन घेण्यात आलेले आहे. त्याचा उपयोग प्रापर झाला नाही.सीएस कडून उपलब्धता

करुन देण्यात येत होती परंतु महानगरपालिकेने मागणी केली नाही. ९९८ नोहेंबर २०२० ला प्राप्त झालेले आहे. त्या वेळेला आपल्याकडे इंदीरा गांधी रुग्णालयला २०५ , आयसोलेशन हॉस्पीटलला ९६, पाचपावली सुतिकागृहाला ३५ आणि उर्वरितची इस्पायरी डेट लवकरच त्या तारखेमुळे उर्वरित ६७२ व्हाईल्स गर्व्हमेंट मेडीकल कॉलेजला देण्यात आलेले आहे. याचे सविस्तर उत्तर प्रशासनाकडून ताईंच्या तक्रारीवरती देण्यात आले आहे. यामध्ये कुठलीही अनियमितता, कुठलाही भ्रष्टाचार झाल्याचे सकृतदर्शी दिसून येत नाही. यानंतर मा.सत्तापक्ष नेत्यांच्या निवेदनावरती मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे दुर्धर साथीच्या रोगासाठी प्रतिबंधात्मक कार्यवाहीचा विस्तृत अहवाल महासभेच्या पटलावर ठेवण्यात यावा त्या अनुषंगाने प्रशासनाद्वारे २१ जून २०२१ रोजी त्या अहवालानुसार विस्तृत अहवाल मा.महापौरजी यांना सादर करण्यात आला. हा सगळयापर्यंत पोहचलेला आहे. या अनुषंगाने मला सभागृहाला सांगावेसे वाटते की आपण पूर्वी सुध्दा निर्देशित केल्याप्रमाणे प्रशासनाने जे जे आदेश काढले त्याची प्रत संबंधित पदाधिकारी यांच्यापर्यंत पोहचविण्यात येत आहे. मी सचिवालयाचा सुध्दा अति.आयुक्त आहे. मी सचिवालयाला विनंती राहील अशाप्रकारचे जे ही आदेश आपल्याला प्राप्त होतील मग ते वॉटस्‌अपच्या माध्यमातून असो, मेलच्या माध्यमातून असो किंवा फिजीकली प्राप्त होतात ते वेळोवेळी महासभेपुढे संकलीत करुन ठेवण्यात यावे. मग तो कुठलाही आदेश असो, ॲपेडॅमीक ॲक्ट अंतर्गतचा आदेश असो, लॉकडाऊन संदर्भातील आदेश असो, इतर कुठलाही महत्वाचा आदेश असो, मग तो पॉलीसीच्या संदर्भातील आदेश असो, सचिवालयाने महासभेपुढे वेळोवेळी मांडाव्या. या दोन्ही बाबींमध्ये प्रशासनाची कुठे लॅकोमा राहीली असेल तर त्याची पुर्तता करुन घेण्यात यावी. यानंतर कुठल्याही प्रकारचे आदेश महासभेला मिळाले नाही अशी बाब होणार नाही याची निगम सचिवामार्फत दक्षता घेण्यात यावी. या मुद्दयावरती प्रशासनाकडून विस्तृत अहवाल सादर करण्यात आलेला आहे त्यामध्ये सगळया बाबी सविस्तर मांडल्या आहे. २०२०-२१ चा निधी कसा कसा प्राप्त झाला आहे तो त्यामध्ये नमुद करण्यात आला आहे. २०२१-२२ मध्ये १५ कोटी ८८ लाख आला आहे तो त्यामध्ये नमुद करण्यात आला आहे. आता काही मा.सदस्यांनी कोव्हीड साठी महत्वाचा टप्पा आहे लसीकरणाचा, लसीकरणाच्या बाबतीत सभागृहामध्ये चर्चा घडवून आणली. लसीकरणाच्या बाबतीत मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे आम्ही मोठया प्रमाणात लसीकरण करण्याचे ध्येय या महानगरपालिकेने ठरविलेले आहे. मा.महापौरजी यांच्या निर्देशानुसार आपण २०० पेक्षा जास्त लसीकरण केंद्र तयार करण्याचे काम केले आहे त्यापैकी १२२ सरकारी केंद्र आजतागत सुरु आहेत आपण निर्देश केले होते की आपण जो स्टॉफ घेतलेला आहे तो लसीकरणाकरिता वापर करावा पुन्हा एकदा मी महासभेपुढे सादर करु इच्छितो की प्रशासन स्टॅन्डींग कमेटीचे या ठिकाणी आभार मानू इच्छिते की सगळया शहरामध्ये मेडीकल विभागाचा जो मॅनपावर आहे तो मॅनपावर अतिशय किल्ष्ठ विषय आहे, तेथे त्यांना मॅनपावर उपलब्धच होत नाही. आमच्या स्टॅन्डींग कमेटीने प्रशासनाच्या विनंती वरुन आम्हांला एक मंजूरी दिली की जो एनयुएचएम मध्ये जी सॅलरी गर्व्हमेंटकडून मेडीकल, पॅरामेडीकल स्टॉफला या कोव्हीड काळात काम करण्यासाठी देण्यात येते. त्यापेक्षा जास्त टॉपअप करुन देण्यात आलेला आहे. त्यामुळे आम्हांला हा मॅनपावरचा इश्यू आमच्या

शहराकरिता कधीही झालेला नाही. मी येथे सांगेल की १२०० च्या जवळपास मॅनपावर आजही कार्यरत आहे. यामध्ये स्पेशालिस्ट डॉक्टर मिळत नव्हते, जे एमडी मेडीसीन जे डॉक्टर आहेत त्यांचे या कोरोनामध्ये मोठे काम आहे. ज्यांचे नॉलेजचा उपयोग होत आहे. अशा एमडी मेडीसीन डॉक्टरांना २ लक्ष रुपये एनयुएचएममध्ये २ लक्ष रुपये मिळत होते त्या अनुषंगाने आपल्याला स्टॅन्डींग कमेटीच्यायाच मंजूरीद्वारे आम्हाला २ लक्षावरुन २.५० लक्ष रुपये देता येईल. हा ५० हजार रुपयाचा गॅप महानगरपालिकेने देण्याची मंजूरी या स्टॅन्डींग कमेटीच्या आदेशाने मिळालेली आहे. जे एमबीबीएस डॉक्टर होते त्यांना एनयुएचएम मध्ये ६० हजार रुपये सॅलरी मिळत होती ते टॉपअप करुन आमच्या स्टॅन्डिंग कमेटीच्या सर्व सदस्यांनी एकमताने मंजूरी देवून एक निर्णय घेतला आणि या एमबीबीएस डॉक्टरांची सॅलरी १ लक्ष रुपये केली. नर्सेस असो, फार्मास्टिस्ट असो यांना मधला टॉपअप दिला त्यामुळे पॅरामेडीकल,मेडीकल स्टॉफ वानवा अजूनही आपल्याला झालेली नाही. मेडीकल, पॅरामेडीकल स्टॉफची जी अडचण आहे ती या शहराला कधीही झालेली नाही. हा स्टॉफ आपल्याला वॅक्सीनेशनसाठी आजही उपलब्ध झालेला आहे. स्टॅन्डींग कमेटीचे मी पुन्हा एकदा आभार मानतो. त्यांनी दुसरा या फिल्ड मध्ये काम करणारा एनयुएचएमचा जो रेग्युलर कर्मचारी वर्ग आहे त्यांची सॅलरी एनयुएचएमच्या द्वारे दिली जाते ती अतिशय अल्प आहे हे लक्षात घेता त्यांनी सप्टेंबरमध्ये एक ठराव घेतला आणि या मंजुरीद्वारे स्टॅन्डींग कमेटीने १५०० रुपये एनयुएचएमच्या सर्व कर्मचा-यांना अतिरिक्त वाढीव सॅलरी देण्यास मंजुरी दिली आहे. या तीन महिन्यामध्ये जी परिस्थिती होती त्यामध्ये या एनयुएचएमच्या कर्मचा-यांचा कामामध्ये आधार मिळाला. त्याचप्रमाणे आशा वर्कस् यांना स्टॅन्डिंग कमेटीच्या मान्यतेने १ हजार रुपये अतिरिक्त मोबादला महानगरपालिकेच्या निधीतून देण्यात आला आहे. या स्टॅन्डिंग कमेटीने दोन्ही-तिन्ही जे निर्णय घेतल्यामुळे आपल्याला मॅनपावर क्रन्च कधी भासला नाही. या परिवहन समितीने आपल्या कल्पकतेतून जेव्हा आपण सगळे लोक जाणता पॉझीटीव्ह व्यक्तींची संख्या ८ हजार पर डे पर्यंत वाढली होती. अशा परिस्थितीत मोठया प्रमाणात आपल्याला ॲम्बुलन्सची गरज भासली होती. मृत्यूची संख्या वाढलेली होती. गर्व्हमेंट मेडीकल कॉलेज, इंदीरा गांधी मेडीकल कॉलेज सेंट्रल इंडीआचे मोठे हॉस्पीटल असल्यामुळे आपल्याकडे छत्तीसगढ, मध्यप्रदेश मधून मोठया प्रमाणात पेशंट रेफर केल्या जात होते. येथे त्यांचा मृत्यू होत होता, दुस-या राज्याचे पेशंट आहेत म्हणून त्यांना एम्बुलन्स किंवा शववाहिका पुरवायची नाही असे धोरण न ठेवता महानगरपालिकेने त्यांना सुध्दा मदतीचा हात पुढे केला. याच परिवहन समितीने आम्हांला बसेसचे रुपांतर शववाहिकेमध्ये बसेसचे रुपांतर एम्बुलंन्समध्ये करुन त्याद्वारा आम्हांला एम्बुलंन्स आणि शववाहिका उपलब्ध करुन दिल्या. यामध्ये काही एनजीओ सुध्दा यामध्ये उपलब्ध करुन दिल्या आहे. याप्रमाणे दोन्ही बाबींना या परिवहन आणि स्टॅन्डिंग कमेटीने तसेच आरोग्य समितीने सुध्दा मदत केली आहे तसेच आमच्या आरोग्य विभागाच्या कर्मचा-यांनी सुध्दा मदत केलेली आहे. या शिवाय पीपीटी किट देण्यामध्ये एनजीओचा हातभार आहे. आपल्याकडे सुरुवातीपासूनच नागपूर शहराचा पॅटर्न असा आहे की तो एनजीओवर आधारीत आहे. मार्च महिन्यात जेव्हा पहिला पेशंट आढळला तेव्हापासून लॉकडाऊन झाल्यावरती मग बाहेर राज्यातून , पर प्रान्तातून आलेला मजूर वर्ग यांना थांबविण्याची व्यवस्था

करण्याकरिता आपल्या ब-याच एनजीओ समोर आल्या. काही एनजीओने आपले सभागृह फ्री ऑफ कॉस्टमध्ये आपल्याला उपलब्ध करुन दिले. काही एनजीओने या लोकांची नास्ता, जेवणाची व्यवस्था करण्याची तयारी दाखविली तर काही ठिकाणी मात्र आपल्याला व्यवस्था करावी लागली. ताईंनी एक मुद्दा असा मांडला की २२ लाख नागरिकांना अन्नदान करण्याकरिता वेगळा पैसा कां दयावा लागला. हे २२ लाख लोक आपल्या घरात, स्लम वस्तीमध्ये राहणारे लोक होते. लॉकडाऊनमुळे ते बाहेर कामावर जावू शकत नव्हते त्यांच्या जेवणाची व्यवस्था एनजीओच्या माध्यमातून आपण केलेली आहे त्यामध्ये मोठमोठया एनजीओ होत्या सर्व दाते होते, मग ते मैत्री असो, रोटरी असो, लॉयन्स कल्ब असो अशा सर्व मोठया ज्या संस्था आहेत या सगळया संस्थांचा मा. महापौरजी यांनी सत्कार कार्यक्रम सुध्दा घेतला आहे. या सगळया संस्थानी उत्कृष्ठ असे काम करुन स्लम मध्ये राहणा-या लोकांना कुठे भुखेले राहू दिले नाही. दुसरा जो वर्ग होता तो आपल्याकडे मजुर वर्ग होता. पर प्रान्तातून किंवा आपल्या आजूबाजूच्या गावातून येथे आला होता. नागपूरचे लोकेशन असे आहे की आपण सेंट्रलमध्ये असल्यामुळे आपल्या आजूबाजूचे लोक येथे येत होते. मला अजूनही आठवते जेव्हा आमचे नगरसेवक होते ते आताचे आमदार प्रवीणजी दटके यांनी जेव्हा रात्री फोन केला की १५० लोकांचा जत्था नागपूर शहरातून जात आहे तुमच्या सध्याच्या शाळांमधून जर जागा नसेल तर मी दुसरा हॉल उपलब्ध करुन देतो आणि आजची व्यवस्था करतो आणि पुढेही आमची संस्था त्यांची व्यवस्था करेल अशाप्रकारे प्रत्येक नगरसेवकाने, प्रत्येक पदाधिका-यांनी यामध्ये पुढाकार घेतला. त्यामुळे आपण या लोकांची व्यवस्था करु शकलो. याच्या पलीकडे जावून या लोकांची व्यवस्था येथे ते लोक असेपर्यंत त्यांच्या जेवण, खाण्यापिण्याची व्यवस्था केली नाही तर येवून परत जातांना त्यांना रेल्वेने जातांना त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करुन दिली आहे. काही लोकांचे या ठिकाणी मला नाव घेतलेच पाहिजे. संकल्पना नावाची संस्था आहे या संस्थेने मोठया प्रमाणात अन्नाची व्यवस्था करुन दिली. मैत्री संस्था आहे, लॉयन्स आहे, पुर्णा नावाची संस्था आहे. या सर्वांनी काही फॉर्मल रजिस्टर्ड संस्था आहेत तर काही अनफॉर्मल संस्थाआहेत त्यांनी आपआपले गट स्थापन करुन घरात अन्नदान तयार करुन मेहनत करुन अन्नदानाचा पुरवठा केला त्याद्वारे आपण सगळया नगारिकांना मदत पुरवू शकलो. या व्यतिरिक्त डीसीएसी म्हणजे जेव्हा आपण आपले दवाखाने सुरु करण्याची वेळ आली. आपण काही दवाखान्याचे इन्फ्रास्टक्चर काही दिवसापूर्वी तयार करुन ठेवले होते होते. इंदीरा गांधी पहिला रुग्णालय आहे त्यामध्ये आपण डीसीएसी सुरु करु शकलो. कालातरांनी आपण आपले दवाखाने त्या त्या प्रमाणात सुरु करु शकलो. ऑक्सीजनचा पुरवठा करण्यास खुप त्रासदायक झाले परंतु ते सुध्दा प्रशासनाने त्या त्या लोकांकडून, पदाधिका-यांनी ताकदीने मदत केली. ऑक्सीजनचा पुरवठा झाला परंतु आमच्या दवाखान्याच्या जाहीरातवरुन काही वैद्यकीय अधिकारी यायचे परंतु त्यांच्यात संभ्रम राहायचा की कुणासोबत काम करावे लागेल, कुठल्या दवाखान्यात आमची नेमणुक होईल, सहकारी अधिकारी कोण राहील. या पॅरामेडीकल क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात काम करणारा बहुतेक हा महिला वर्ग होता. ते लगेचच काम करण्यास तयार होत नव्हते. म्हणून आयुक्तांच्या कल्पकतेतुन आणि मा.महापौरजी यांच्या पुढाकाराने आपण एनजीओशी मध्यस्थी करुन एक वेगळी नवीन संकल्पना महानगरपालिकेसाठी

राबविली. आज आपल्याकडे जमाते इस्लाम या संस्थेद्वारे डीसीएसी पाचपावली पोलीस स्टेशनमध्ये उभारली जो मेडीकल स्टॉफ आहे तो महानगरपालिकेतून पेड असला तरी त्यांचा समन्वय जमाते इस्लाम या संस्थेने केला. या ७५-७८ बेड ला चांगल्या रितीने कार्यान्वित करु शकलो. मा.महापौरजी या ठिकाणी उद्‌घाटनाला आले होते. त्याप्रमाणे आपल्याकडे पाचपावली मॅटरनरीमध्ये ११०-११५ बेडची व्यवस्था होती. तेथे जो मेडीकल स्टॉफ होता काम करण्यास मागे पुढे पाहत होता. दुसरी एक संस्था आसरा नावाची आहे. या आसरा नावाच्या संस्थेद्वारे डॉक्टर लोकांच्या मदतीने आपल्या समन्वयाने तेथे सुध्दा व्यवस्था केली. तिसरे आपले केटीनगरचे हॉस्पीटल आहे तेथे ११०-११५ बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. तेथे ऑक्सीजनचे बेड उपलब्ध करुन दिले तेथे फुके फाऊन्डेशन ही संस्था पुढे आली तेथे अशाप्रकारे नर्सिंग स्टॉफ, डॉक्टरांना अर्ज करायला लावला आपल्याकडून अपाईंटमेंट करुन घेतल्या. केटीनगर हॉस्पीटल ताकदीने चालवून तेथील लोकांची सेवा केली. आणखी याला एक्टेन करता आले, मैत्री संस्था पुढे आली आणि मैत्री या संस्थेद्वारे आपण पकवासा रुग्णालय कार्यान्वित करु शकलो तेथे सुध्दा लोकांना आपण सेवा देवू शकलो. वेगवेगळया प्रयोग आपण केले. एक रेल्वे स्टेशनचे तेथे त्यांचे हॉस्पीटल आहे तेथे ऑक्सीजन बेड नव्हते. आपल्या आयुक्तांच्या कल्पकतेतून, मग मी म्हटले की ठीक आहे, तुम्ही ऑक्सीजन बेड तयार करा नाहीतर तुमचा स्टॉफ आम्हांला दया. तेथे स्व:त आयुक्त साहेब आले आणि तेथील डीजीओ मॅडमशी चर्चा केली त्यांनाआग्रह केला आणि त्यांचा स्टॉफ आपल्या आयुष हॉस्पीटलसाठी उपलब्ध करुन दिला. अतिशय एक्सपर्ट असलेला हा रेल्वे स्टॉफ आयुष हॉस्पीटलमध्ये सेवा देण्यासाठी उपलब्ध करुन दिला. नवीन नवीन प्रयोग नागपूर महानगरपालिकेद्वारे करण्यात आले आहे. त्या आधारावर आपण कोरोची लढाई लढण्यासाठी यशस्वी झालो असे म्हणण्यास हरकत नाही. ही लढाई येथे थांबणार नाही पुढेही आपल्याला कोरोनावरती भरपूर काम करायचे आहे. काही बाबी पुढे म्युकामायासिस असो किवां इंफोसिरींगची गरज असो. या सगळया बाबींवर अभ्यास करावयाचे आहे तसेच तिस-या व्हेव्हची सुध्दा व्यवस्था करण्यासाठी मा.महापौरजी यांनी बैठक घेवून त्या बैठकीतून निर्देश दिलेले आहे. एनसीए च्या मदतीने तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर युनिर्व्हसीटी आहे त्यांच्या प्रशासकीय इमारतीमध्ये चाईल्ड हॉस्पीटलची आपण तयारी करतो आहे. मा.महापौरजी यांनी पुढाकार घेवून हे काम सुरु केली त्यांनी १५० ते २०० खाटा करण्याची आवश्यकता आहे आणि तसे करण्याची निर्देश दिलेले आहे आणि त्यावर प्रशासन कामास लागलेला आहे. तसेच पुढच्या तिसरी लाटेची तयारी करण्यास आपण मागे नाही परंतु स्पीड वाढविण्याची गरज आहे. वेद्यकीय विभागाच्या कर्मचा-यांना पदाधिका-याकडून, महासभेकडून, महानगरपालिकेकडून आणखी प्रेरणा मिळाली तर याच अधिकारी, -कर्मचा-याकडून आपण चांगले काम करु शकतो अशी मला या सभागृहापुढे विनंती वजा मांडणी करावयाची आहे. सगळे मुद्दे मी कव्हर करण्याचा प्रयत्न केला आहे. मी आता आपले दोन शब्द येथे संपवितो. धन्यवाद

महापौर:-निगम आयुक्तांनी निवेदन करावे.

निगम आयुक्त:-सन्माननीय महापौर साहेब, सन्माननीय सभागृह. या ठिकाणी मा.सदस्या श्रीमती आभा पांडे यांचे काही आक्षेप होते, काही आरोप होते. त्या अनुषंगाने याठिकाणी स्थगप्रस्तावावर चर्चा झालेली आहे. ख-या अर्थाने आजची चर्चा मा.सदस्या श्रीमती आभा पांडे यांच्या वक्तव्यानंतर बरेच नगरसेवकांच्या मनामध्ये शंका निर्माण झाली होती. अशाप्रकारे काही गडबड झाली आहे, काही भ्रष्टाचार झालेला आहे यामध्ये नक्कीच चौकशी करायला पाहिजे. मला नक्कीच खात्री आहे, मॅडमला दिलेल्या उत्तर या ठिकाणी जर प्रापरी वाचून दाखविले असते तर बरेच लोकांची शंका दूर झाली असती. परंतु प्रत्येक उत्तर त्यामध्ये खुप डिटेल्स स्वरुपात असल्यामुळे वेळ जावू नये म्हणून त्यांनी मुद्दे मांडले असतील. त्यामुळे आम्हांला मुद्दे निहाय उत्तर देण्याची संधी मिळाली. राम जोशी यांनी प्रत्येक मुद्दयावर उत्तर दिले आहे. याच्यामध्ये मी एक गोष्ट सांगू इच्छितो, सभागृहाला आग्रहाची विनंती करतो , करोनाचे असो किंवा रेग्युलर कामाचे असो यामध्ये कोणत्याही नियमाची तोडफोड, पाठराखण करण्याचा प्रशासनाची भुमीका राहीली नाही आणि कधीही राहणार नाही. ट्रास्परंसी राहणार आहे. मॅडमने बोलता बोलता म्हटले की माहिती देण्यात आली नाही. राम जोशीने उत्तर दिलेले आहे. जे काही मुद्दे असतील, मॅडमला जी काही माहिती पाहिजे असेल, मी मागच्या जीबीमध्ये सुध्दा म्हटले होते. जी काही माहिती  पाहिजे असेल ती माहिती देण्यास तयार आहे. सांगायचा मुद्दा असा आहे ट्रान्सपरंसी म्हणून कुठेही कॉम्प्रमाईज नाही आहे. यापुढे जावून सांगायाचे झाले तर ज्यावेळी मॅडमने १० तारखेला मुद्दा उपस्थित केला तेव्हा मी सांगितले मॅडमला उत्तर देतांना प्रत्येक मुद्दानिहाय याचा सखोल अभ्यास करुन त्याचे स्पेसिफिक उत्तर देण्यात यावे. उदाहरण सांगायचे झाले तर त्यांना उत्तर मिळाले होते परंतु कोणत्या तारखेला ,कोणत्या प्रकरणांमध्ये, कारण सहजतेने कुणाला शंका निर्माण होवू शकते. पीपीटी घोटाळा झाला, पीपीटी घोटाळा काहीच नाही. जेव्हा लॉकडाऊन झाले तेव्हा पीपीटी किटचा रेट जास्त होता. कोरानामध्ये सगळयांची परिस्थिती तशीच होती. मॅडमचा मुद्दा तोच होतो, याच्यात घोटाळा झाला आहे असे त्यांनी वक्तव्य केले. त्याच्यामुळे मी माझ्या अधिका-यांना सांगितले मॅडमला नीट माहिती मिळाली पाहिजे. त्यांचा संभ्रम निर्माण झाला होता की ८५० रुपयाला पीपीटी किट खरेदी केली त्यामुळे त्यांच्या उत्तरामध्ये डिटेल्स माहिती दिली की कोणत्या तारखेला ८५० रुपयामध्ये पीपीटी किट मिळाली आणि कोणत्या तारखेला १५० रुपयामध्ये आपण पीपीटी किट खरेदी केली. याच्यामध्ये कोणत्याही प्रकारे ट्रान्सपरंसीमध्ये घोळ केलेला नाही. जे त्यांनी मुद्दे उपस्थित केले त्याचा टू द पाईंट आपण उत्तर दिलेले आहे. म्हणून माझी विनंती अशी आहे, प्रत्येक आरोपामध्ये, प्रतिक्रियेच्या संदर्भात या ठिकाणी या विषयावर मा. पिंटूजी झलके यांचे वक्तव्य मी सभागृहाला सांगू इच्छितो, आरोप असले की आपण दोन गोष्टी बघतो, ॲडमिनीस्ट्रेशन लेव्हलवर फायनॉनशियल अनियमितता झालेली  आहे काय? आज या ठिकाणी मी खात्रीने सांगू इच्छितो की हे जे काही आरोप आहे त्यानुसार कोणत्याही प्रकारची फायनॉनशियल अनियमितता झालेली नाही आणि  कुठे ॲडमिनीस्ट्रेशन लेव्हलवर लॅक झाला असेल तर तशी तरतूद आहे. आम्ही तयार आहोत. त्यामध्ये आम्ही डिटेल्स् उत्तर दिलेले आहे. मॅडमच्या तक्रारीचा जो सारांश होता तो रेट फिकेक्शन आहे मी उदाहरण दिले पीपीटी किट रेटच्या संदर्भात तसेच  ऑक्सीमीटरच्या रेटच्या संदर्भात होता. कोरोनाच्या काळामध्ये हया सगळया न्यु

थींग होत्या. उदाहरण सांगायचे झाले तर सॅनीटायजर आपल्याला आठवत असेल मागच्या मार्च महिन्यात मिळत नव्हते. डेटॉलचे सॅनीटायजर कोणत्याही दुकानात मिळत नव्हते. त्यानंतर नवीन कंपनी तयार झाल्या त्यामुळे आपण एका काळामध्ये एका रेटने घेतले तर दुस-या वेळेस दुस-या रेटने घेतले. मॅडमने म्हटले की सेम रेट का वापरले, उदाहरण सांगायचे झाले तर मुंढेसाहेब आयुक्त असतांना त्यांच्या काळामध्ये कमेटी स्थापन करुन टेंडर काढून रेट निश्‍चित झाले होते. नियमाप्रमाणे एक वर्षभरात टेंडरचे रेट वॅलीड राहतात, वर्षभर वापरता आले असते. परंतु अनावश्यक निधी आपला खर्च झाला असता म्हणून वेळोवेळी आपण काळजी घेत होतो. मॅडमचा जो मुद्दा आहे त्याची आपण खात्री करुन घेतली आहे. फायनॉनशियल लॅप झाला आहे यासाठी पुर्ण फायनॉन्सशियल प्रोसिजर फॉलो केली की नाही याची पुर्ण खात्री करुन घेतली आहे. काही ठिकाणी मॅडमचा संभ्रम होता की कशाला तुम्ही एका प्रकरणांत दोन निधीतून खर्च केला. मी खात्रीने सांगू इच्छितो की आपण करोनाच्या काळात काम करीत असतांना आपल्याला महत्वाचे दोनच निधी प्राप्त झाले होते. एसबीआयएफचा निधी आणि एनयुएचएमचा निधी. कोणता निधी किती येईल माहीत नव्हते. पहिला हाऊस आहे ज्यामध्ये माहिती देत आहे. मॅडमने वाचले असेल आम्ही जी माहिती दिली आहे त्यामध्ये टिप्पणीमध्ये दिलेले आहे. एनयुएचएम स्लॅश जीआरए असे त्यांनी बरेच ठिकाणी बधितले असेल. मात्र कोणत्याही कामाला, एका कामाला दोन पेमेंट झाले असेल तर नक्की त्याच्यामध्ये फायनॉनशियल अनियमितता झालेली असेल असे मी मानू शकतो परंतु अनेक कोणत्याही ठिकाणी झालेले नाही. असे आम्ही करु दिलेले नाही. तिसरा महत्वाचा मुद्दा असे काही मुद्दे मॅडमने बोलतांना बोलले, ते दोन तीन मुद्दे मी या ठिकाणी सांगू इच्छितो, जास्त वेळ घेणार नाही राम जोशी यांनी संपुर्ण सविस्तर माहिती सांगितली आहे. प्रत्येक लोकांना ज्यांनी या काळात काम केले आहे त्याचे कौतुक केले पाहिजे असेही सांगितले गेले आहे. फ्रन्टलाईन वर्कर ला काम करायचे असेल तर आपल्या बॅक साईडला ऑफीसमध्ये जेथे काम करीत आहे. जोशी असो, डॉ.चिलकर असो यांना वेळेवर निर्णय घेणे आवश्यक आहे. वेळेवर निर्णय घेवून आपण जे पीपीटी किट, मॉस्क खरेदी आहे, असे साहित्य आहे जे वेळोवेळी फ्रन्टलाईन वर्कर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आपण फ्रन्टलाईन वर्करचा जीव धोक्यात टाकणे अपेक्षित नाही. हे काम करीत असतांना दोन-तीन मुद्दे प्रॅक्टीकल आहेत. काम करीत असताना मा.महापौरजी यांना माहीत आहे. मा.पिंटूजी झलके यांना माहीत आहे ते स्थायी समितीचे अध्यक्ष होते आणि भोयर साहेबांना माहीत आहे. आपण काम करीत असतांना कोरोनामध्ये महत्वाच्या ज्या समस्या आहे त्या सभागृहाला जाणून घेणे आवश्यक आहे. आपल्याला काम करावयाचे आहे आणि वेळेवर काम करावयाचे आहे. ज्या केसमध्ये सप्लॉय करावयाचे आहे, डिमांड भरपूर होती. विदर्भातील सर्व जिल्हे अफेक्टेड होते. पुर्ण राज्यामध्ये, पुर्ण देशामध्ये एक सप्राईज होता की काय करावयाचे कसे करावयाचे. हे यासाठी सांगत आहे की मॅडमचा एक प्रश्न होता पुण्याचे रेट कां वापरले नाही, मुंबईचे रेट कां वापरले नाही. कुठेही नियम नाही. तुमच्या माहितीसाठी सांगतो, शासनाचा जी.आर.आहे. आपातकालीन परिस्थितीत कशाप्रकारचे परचेस करावयाचे. तरी सुध्दा आपण भंडा-याचे रेट कां घेतो. पहिला मुद्दा आहे, भंडा-याची जी रेट लिस्ट आहे ती तेथील जिल्हाधिकारी, किंवा तेथील सिव्हील सर्जन

यांनी तयार केलेले रेट आहेत. दुसरा महत्वाचा मुद्दा असा, कोरोना मध्येअव्हेलिबीटी मटेरियल जी होते ते रेट कॅम्पॅरीटी असतील तर आपण त्याकडे जातो. त्यासाठी एक सांगतो, हॉकीन, रेमीडेसीवीरची अडचण आपण सर्वांनी फेस केली होती. निश्चित रेट काढण्यात येते होते. मा.गडकरी साहेब, मा.पालकमंत्री साहेब हे सगळे प्रयत्न करीत होते. हॉकीनकडे आपल्याला कोण सप्लॉय करेल जो रेट कॉन्ट्रक्टर असेल, त्यामुळे ब-याच घटना झाल्यात. त्यामुळे हॉकीन इज नॉट ए सायको स्टॅन्ड, जितके आपल्याला रेट सामान वेळोवेळी उपलब्ध होते त्याचे रेट तिघांचेही नियमानुसार योग्य आहेत. त्यामुळे मॅडमचा जो काही संभ्रम आहे आम्ही जितके डिटेल्समध्ये देता येईल तितके उपलब्ध करुन दिले आहे. यापुढे मा.आभा पांडे मॅडम असो किंवा कोणत्याही मा.सदस्यांना एखाद्या स्पेसिफिक विषयाचा ॲक्शन किंवा ट्रान्झॅक्शन असो. त्यांनी माझ्याकडे कधीही येवू शकतात मी टाईमबाऊन पध्दतीने त्याचे सोल्युशन देणार आहे ती हे या ठिकाणी सभागृहाला सांगू इच्छितो. दुसरा महत्वाचा मुद्दा मॅडमचा होता याची चौकशी करावी, ऑडीट चौकशी करावी, काहींचे म्हणणे होते की सभागृहाची चौकशी समितीद्वारे चौकशी करावी. मी परत सभागृहाला विनंती करेल की सभागृहाचा अमुल्य वेळ वाया घालविण्याची काही आवश्यकता नाही. हा सर्व फंड एसबीआयएफचा फंड आहे आणि एनयुएचएमचा फंड आहे, शासनाचा फंड आहे. आपण आज जरी खुलासा केला तरी या फंडाचा संपुर्ण ऑडीट शासनाद्वारे होणार आहे. त्यामुळे वेगळे काही आपल्याला करण्याची आवश्यकताच नाही. त्यामुळे प्रत्येक फंडाचे ऑडीट होणार आहे ज्यात कुठला पॅरा समाधानकारक राहणार नाही तर ते एजीकडे जाणार आहे. एजीचे समाधान नसेल तर पब्लीक अकाऊन्ट कमेटीकडे जाणार आणि त्यांचे ही समाधान नसेल तर कॅगपर्यंत काही पॅरा जावू शकतील त्यामुळे सभागृहाचे फिलींग आहे त्याची शासनाकडून पुर्तता होणार असल्यामुळे त्यामध्ये आभापांडे मॅडमचे जे चौकशीची रिकवेस्ट आहे त्याची आवश्यकताच नाही आहे. प्रशासनाला ते मान्य नाही परंतु असे सांगतांना मा.सदस्यांची जर स्पेसिफिक तक्रार असेल तर त्या स्पेसिफिक तक्रारीवर प्रशासनाचा हेड म्हणून मी बघणार आहे त्याची माहिती देणार आहे. आणि वेळोवेळी सभागृहाला माहिती देणे ही आमची जबाबदारीआहे. त्यामुळे मा.महापौर महोदयांनी मा.सत्तापक्ष नेत्याच्या पत्राच्या अनुषंगाने सुचना दिली त्याप्रमाणे तातडीने तो अहवाल सभागृहाच्या समोर ठेवायला सांगितला. जरी आम्ही सेक्शन १२९ प्रमाणे काही आर्डर केलेली नसली तरी ट्रान्सफरंसीमध्ये कुठलाही भार येवू नये म्हणून आपण दिले होते. आपल्याला प्रत्येक मा.सदस्यांनी, प्रत्येक नगरसेवकांनी वेळोवेळी सहकार्य केलेले आहे. येणा-या काळामध्ये आपल्यापासून कोरोना सुटलेला नाही, येणा-या काळामध्ये आपल्याला खुप चॅलेंन्जींग पिरेड असणार आहे आपल्याला वॅक्सीनेशन सुध्दा करावे लागणार आहे. तिस-या लाटमुळे जो संभाव्य धोका आहे. आपल्या शहराला वाचविण्यासाठी आपल्याला जे आवश्यक असेल ते करावे लागेल. कदाचित तुमच्या मनात काही शंका असेल जे इंटरप्रिटीशन करतांना उत्तर देतांना आली असेल ती दूर करण्यास मी तयार आहे. त्याकरिता माझ्याकडे येवू शकता, सभागृहाची वेळ खर्च करण्याची किंवा शासनाकडे जाण्याची, मॅडमची जी अपेक्षा आहे ती शासन करणारच आहे. त्यामुळे आजच्या सभेत सविस्तर माहिती देण्याची संधी मिळाली असे आम्ही याच्यामध्ये गृहीत धरतो. याच्यामध्ये पाहिजे तर आपण काय करु,

मॅडमला जे उत्तर दिले आहे त्याची कॉपी आपण प्रत्येक मा.सदस्यांना सर्क्युलेट करण्यात यावी त्यामध्ये मॅडमनी काय प्रश्न उपस्थित केले आणि प्रशासनाने काय उत्तर दिले. प्रत्येक मा.सदस्यांना कॉपी उपलब्ध करुन देण्यास काही हरकत नाही. मा.महापौर महोदयांनी आम्हांला संधी दिली आणि यावर चर्चा झाली. मॅडमची जी मागणी आहे त्याला फेटाळण्यात यावी अशी मी विनंती करतो आणि आपले दोन शब्द संपवितो.

श्रीमती आभा पांडे:-मा. महापौरजी, आदरणीय अप्पर आयुक्त साहेब श्री. राम जोशी यांनी बोलता बोलता म्हणाले की आम्ही जे उत्तर त्यांना दिलेले आहे त्याबद्दल त्या काहीही बोलल्या नाहीत. मा. महापौरजी, चर्चेला सुरुवात केली तेव्हा पहिला मुद्दा माझा असा होता की मा. आयुक्तांनी जे उत्तर दिले त्यामध्ये ते संतुष्ट आहेत काय? त्यांनी उत्तर दिले असते तर निश्चितच त्या उत्तरावर बोलले असते परंतु मा.महापौरजी आपण सुध्दा निर्देश दिले होते की आपण त्यांचे सगळे बोलून झाल्यावर आपण बोलावे म्हणून मी थांबली आणि त्यावर बोलली नाही. अपर आयुक्त श्री.राम जोशी यांनी सांगितले समिती स्थापन झाली होती. तांत्रिक समिती होती त्या समितीला निर्णय घ्यावयाचा होता. अनेक नस्त्या मी आपल्या केबीनमध्ये बसुन वाचलेल्या आहेत. त्या नस्तीमध्ये त्या समितीची मंजूरी नव्हती, तो कागद त्या नस्तीमध्ये नव्हता मा.महापौरजी. मग माझ्या समोर प्रश्न आला जी पाच-सहा लोकांची जी समिती होती. प्रत्येक खरेदीमध्ये, प्रत्येक नस्तीमध्ये आपण मंजुरी दिलेली नाही. मंजूरीचा कागद लावलेला नाही म्हणून माझा तेव्हाही आरोप होता आणि आताही आरोप कायम आहे. मा.महापौरजी, अपर आयुक्त राम जोशी यांनी सांगितले २७.०३.२०२० ला एक आर्डर आला होता परंतु त्यामध्ये स्वाक्षरी करण्याचे अधिकार दिलेले नाही यांनी स्वाक्षरी केलेली आहे मा.महापौरजी. हा जो प्रस्तावित २०२० कम्पॅरेटीव्ह आर्डरमध्ये घोळआहे मा.महापौरजी. याच्यामध्ये नमुद केले आहे की सोपविण्यात आलेली जबाबदारीअधिका-याचे नाव आहे पदनाम राम जोशी, सोपविण्यात आलेली जबाबदारी, शासनाने विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्याशी समन्वय साधावा, दुसरे होते की महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या कामाचा आढावा आणि सनियंत्रण ठेवणे, नंतर तिसरी जबाबदारी त्याच्यामध्ये नमुद आहे सर्व झोन, प्रभागात सुरु असलेले सर्वेक्षण संदर्भात आवश्यक नियंत्रण करणे. महानगरपालिकेच्या विविध कामाचा आढावा व सनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी दिली होती त्यांना आरोग्य अधिकारी म्हणून स्वाक्षरी करण्याचा अधिकार दिलेला नव्हता. म्हणून मी इंटरप्रीटीशन करीत आहे त्यांनी या ठिकाणी प्रस्तावित जबाबदारीचा जो खुलासा केला आहे त्यामध्ये आरोग्य अधिकारी म्हणून त्यांना डेलीगेट केलेले नव्हते. त्यांनी साहित्यांची खरेदी करतांना सांगितले की रेट कमीत कमी होत गेले. मला माहीत होते मा.महापौरजी की प्रशासनाकडून हेच उत्तर येईल. जर रेट बघितले असते तर ८० जे थर्मल गन एकावेळेस घेण्यात आले नसते. याचा विचार प्रशासनाने करायला पाहिजे होता परंतु मा.महापौरजी प्रशासनाने तसा विचार केलेला नाही. राम जोशी यांनी सांगितले की जे आरोप आभाताई पांडे यांनी लावलेले आहेत ते असे नाही आहेत तसे नाही आहेत असे सांगत आहेत. थर्मल गन जे खरेदी करण्यात आले मा.महापौरजी ते एकाच दिवशी, एकाच कंपनीला ९ लक्ष रुपयाचे दोन बील देण्यात आले आहे.दुसरे ९.६ ला राम जोशी यांना अधिकार देण्याची काय गरज

पडली मा.महापौरजी. सामान्य प्रशासन विभागाला अधिसुचना कां बरे देण्यात आली की राम जोशी यांच्याकडे आरोग्य विभाग राहणार आहे. तशी सुचना नव्हती. त्यांना शासनाने विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्याशी समन्वय ठेवावा, महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या कामाचा आढावा आणि सनियंत्रण ठेवणे, सर्व झोन, प्रभागात सुरु असलेले सर्वेक्षण संदर्भात आवश्यक नियंत्रण करणे. महानगरपालिकेच्या विविध कामाचा आढावा व सनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी अधिका-यांशी समन्वय साधण्याची जबाबदारी देण्यात आली होती. हा पहिला मुद्दा मी रेस केलेला आहे. ती यादी आपण बोलावून घ्या मा.महापौरजी मी आपल्याला सांगू इच्छिते, मला आपल्याला निदर्शनास आणून दयावयाचे आहे. आपण विनंती केली, आपण लक्षवेधी लावली, विशेष सभागृह लावले मा.महापौरजी, त्यावर प्रशासनाने ही माहिती दिली त्याच अनुषंगाने आरोप लावलेले आहे. वेळेवर निर्णय घेतला निश्चितच ते अपेक्षित होते. ती काळाची गरज होती.गरज असेपर्यंत ठीक आहे, मी म्हणत आहे आमचे चेंबर कोलॅप्स झालेले आहे आम्ही चेंबर बनवु शकलो नाही येथे तसेच झाले आहे मा.महापौरजी. रेमीडेसीवीर खरेदीचा विषय असो, पीपीटी किट खरेदीचा विषय असो, थर्मल गनचा विषय असो, या सगळयांच्या बाबतीत शासन ऑडीट करणार आहे. आता दुसरी लाट चालली गेली म्हणून माझी आपणांस विनंती आहे. शासनाचे ऑडीट होईल तेव्हा होईल आपण बाहेरचे जे ऑडीटर आहेत त्यांच्याकडून ऑडीट केले पाहिजे. यात जर प्रशासन चुक करीत असेल तर पुढे येणा-या काळामध्ये आमचे महापौर, नागपूर शहराचे आयुक्त यांचे नाव येईल तसेच यात कोणता अधिकारी फसला गेला नाही पाहिजे हीच माझी आपणांस विनंती आहे. जनतेच्या हितासाठी आपण रुलींग दयावे असे यावेळेला म्हणत आहे. आयुक्तांनी म्हटले खरोखरच काम केले आहे. मी स्व:त सुध्दा म्हटले आहे ज्या ज्या अधिका-यांनी आणि आशा वर्कर्स् हेल्थचे कर्मचारी यांनी रात्री ११ वाजेपर्यंत काम केले बॉडी उचलायला हेल्थ वर्कस् गेले आहे त्यांचे जेवढे कौतुक केले तेवढे कमी आहेत. हेल्थ वर्कर्स ला इंन्टेनसीव्ह दिले पाहिजे. ज्या प्रमाणे सगळयांनाआहोत. या सगळया बाबींमध्ये मला कुणालाही डिवचण्याचे काम करायचे नाही मा.महापौरजी. जी माहिती मिळाली जे मला निदर्शनास आले. ज्या चुका लक्षात आल्या, त्यावरुन मी हे आरोप केले आहे. मी म्हणत आहे की चुका केल्या आहेत आणि याला चौकशीची गरज आहे. आपण संवैधानिक महापौर आहात या सगळया बाबींवर निर्णय घ्याल. मी आभार व्यक्त करते आपण माझ्या विनंती मान्य केली याबाबत आपले कौतुक करते आणि आपले खुप आभार मानते. धन्यवाद.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, या विषयावरती चर्चा झाली. निश्चितपणे सभागृहाचा मानस आपल्या समोर आलेला आहे. आरोप झालेले आहेत, त्याबद्दल चौकशी झाली नाही तर त्याचा परिणाम भविष्यात आपल्याला अनेक प्रकारचे उत्तर देवू लागू शकतात. याच्यामुळे मला असे वाटते की चौकशीमध्ये जे दोषी असतील किंवा नसतील हे आपण आज ठरवू शकत नाही. चौकशी झाली तर कोण दोषी आहे ठरेल आणि भविष्यात याचे परिणाम सभागृहाला भोगावे लागणार नाही. माझी विनंती आहे या संपुर्ण प्रकरणांसाठी योग्य समिती गठीत करावी. कशा पध्दतीने करावी मी सभागृहाला विनंती करतो महापौर म्हणून आपल्याला ते अधिकार देण्यात यावे. अशाप्रकारची ३ मा.सदस्यांची समिती असावी. या

समितीने संपुर्ण प्रकरणाची चौकशी करुन एक महिन्याच्या आतंमध्ये अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवावा अशा प्रकारची विनंती करतो. आपण याप्रमाणे आदेश दयावे अशी आपल्याला विनंती करतो.

महापौर:- मा.सदस्या, श्रीमती आभा पांडेजी ने जो स्थगन प्रस्ताव रखा, उस स्थगन प्रस्ताव पर सदन मे सखोल चर्चा हुई, जिस समय प्रशासन अपना संपुर्ण अहवाल इस सदन के पटल पर रख रहा था, तब मैं यह संभ्रम मे था कि मैं महानगरपालिका के सभागृह मे बैठा हुॅ या फिर किसी न्यायालय मे बैठकर दलील सुन रहा हुॅ यह सच्ची बात है कि, जिस समय कोरोना की शुरुवात हुई, भारत मे कोरोना आयेगा तो भारत के क्या हाल होंगे ऐसा सारे अखबारो मे लिखा हुआ था, और लिखते समय यह भी लिखा हुआ था कि, जिस भारत मे पी.पी.ई.कीट नही बनती, एन-९५ मास्क नही बनते है, उस भारत मे यह सारी सुविधाऐ कहासे मिलेगी। लैकिन भारतवंशी हर चुनौती का मुकाबला सक्षमता से साथ मे सामुहिक रुप से करते है,आज विश्व के सबसे ज्यादा पी.पी.ई. कीट निर्यात करनेवाले देश मे भारत अव्वल स्थान पर है जो भारतवंशीयो के कारण है, और जब हमने इकोनॉमिक्स पढा तो उसमे बहुत अच्छे तरीके से बताया गया है कि, आवश्यकता ही अविष्कार की जननी होती है, जैसी आवश्यकता थी, वैसाही अविष्कार हुआ, और अविष्कार के साथ गतीशिलता बडी, यह बात भी उतनी ही सही है कि, हम व्हेंटीलेटर तक अपने यहां नही बनाते थे, बाहर से खरीदते थे, हमारे यहां एक ऑटोमोबाईल कंपनीने व्हेंटीलेटर बनाकर सस्ते दरो मे व्हेंटीलेटर उपलब्ध कराकर दिये, जिससे व्हेंटीलेटर की कमी दुर हुई, यह सारी स्थितीया परिस्थितीजन्य युध्दस्तर पर लढनेवाले वातावरण के कारण पैदा हुई, और इसमे समस्त देशवासियो ने अपना अपना सहभाग दिया। मा.आभा पांडेजी ने जो प्रश्न किया प्रशासन ने उसपर जो उत्तर दिये, आभाताई के प्रत्येक प्रश्न के प्रशासन ने उत्तर दिये, और तिथी की अनुरुपता के साथ उत्तर दिये, और बाकी सदस्यो ने भी चर्चा करते समय उनके समक्ष प्रशासन के उत्तर न आने के कारण उनके मन मे भी बहुत संभ्रम रहा होंगा, उन सारे संभ्रम का निराकरण करने का काम प्रशासन के माध्यम से किया गया, इन सारी बातो के बावजूद अगर कही कोई शंका खडी होती है तो उस शंका का समाधान करना नितांत आवश्यक होता है, शासन की नियमावली है कि, शासन के व्दारा खर्च की गयी हर निधी का शासन के तरफ से ऐ.जी. का ऑडिट होता है, कारण कि यह उनकी नियमावली है और उसके अंतर्गत इसका भी ऑडिट होंगा यह उत्तर जो सभागृह के पटल पर रखा गया है, उसमे नमुद है, मा.सदस्यो की मांग है कि, इसमे सभागृह की समिती बने, मैं विशेषरुप से एक निवेदन करना चाहता हुॅ कि, जिन्होने आरोप लगाया है वही अगर निर्णय लेने बैठगये तो कही न कही लोगो के सामने एक गलत मॅसेज जायेगा कि यह सोंची समझे तरीके से प्रशासन को बदनाम करने की कोशिश है। इसलिये इस विषय मे हम सभागृह के सदस्यो की समिती नही बनायेगें, मैं एक निवेदन करना चाहता हुॅ सभी सदस्यो की मांग के अनुरुप, नियम के अनुरुप इस संपुर्ण खर्च का ऑडिट होता ही है, इसलिये मा.आयुक्त की अध्यक्षता मे तीन लोगो की समिती बने, जिसमे ऐ.जी. ऑफिस के दो वरिष्ठ ऑडिटर रहे और ऐ.जी. ऑफिस के दो वरिष्ठ ऑडिटर और मा.निगम आयुक्त इनकी उपस्थिती मे यह समिती अपना निर्णय लेकर के एक माह के भितर इसे सभागृह के समक्ष रखे। हममे से जिस भी

सदस्य को उस समिती के समक्ष अपनी बात रखनी है, वह मा.आयुक्त को सूचित करके समिती व्दारा निर्धारीत की गयी तिथी पर उनके समक्ष जाकर के अपनी बात रख सकता है, वहां सभी ने जाना आवश्यक नही है, हममे से जिस किसी सदस्य को यह लगता है कि, उसे समिती के समक्ष जाकर के अपनी बात रखनी है तो वह मा.आयुक्त से निवेदन करके आयुक्त व्दारा प्रदान की गयी तारीख पर समिती के समक्ष जाकर के विषय रख सकता है। मैं इस सभागृह के माध्यम से निर्देश देता हुँ कि, मा.निगम आयुक्त, ऐ.जी. ऑफिस के दो वरिष्ठ अधिकारीयो को जो भी हमे उस ऑफिस के माध्यम से प्रदान किये जाते है, उनके साथ मिलकर के आनेवाले एक माह के भितर इस संपुर्ण अहवाल को सभागृह के पटल पर रखे, संभ्रम हुआ है इसलिये यह सारी चिजे करना नितांत आवश्यक है, इसप्रकार के निर्देश सभागृह के माध्यम से प्रशासन को दिये जाते है। इस सभागृह के समस्त सदस्यो ने आजकी चर्चा मे अपने विषय का प्रतिपादन करते समय दोनो पक्ष को रखने की कोशिश करी, इसलिये मैं समस्त सभागृह के सदस्यो का विशेष रुपसे अभिनंदन करता हुँ। इस सभागृह का मानस है जिस मानस मे सभागृह ने कहां कि, महानगरपालिका के कर्मचारीयो के किये गये हर काम को हम सलाम करते है, सचमुच मे इस साथरोग के दौरान ७९९९ से ११ के आंकडे तक पहुंचाने के लिये  नागपूर महानगरपालिका के निगम आयुक्त से लेकर सारे सफाई कर्मचारीयो तक जिन्हाने महनत करी, उन्हे हम झुठला नही सकते और यह बात संपुर्ण देश के सामने एक मिसाल है कि इस प्रशासन ने कैसे एकीकृत होकर के यह लढाई लडी। यह विषय वर्तमान आयुक्तयापूर्व आयुक्त ऐसा विभाजित न करते हुऐ इस संपुर्ण कार्यकाल  की चौकशी करने के निर्देश दिये जाते है, मा.आयुक्त इस दिशा मे अग्रेषित होकर के कार्यवाही करेगें, ऐसा विश्वास रखते है।

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

**निगम सचिव**
**महानगरपालिका,नागपूर.**

**महापौर**
**महानगरपालिका,नागपूर.**